सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ४३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. ४ मार्च २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# महायुतीची पहिली 'विकेट' पडली
## धनंजय मुंडे यांचा राजीनामा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४मुंबई**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड हा मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय आहे. त्यामुळे मुंडे यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी विरोधक करीत होते. मुंडे यांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला आहे.

त्यांचे पीए प्रशांत जोशी हे राजीनामा घेऊन ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बंगल्यावर गेले होते. फडणवीस यांनी त्यांचा राजीनामा स्वीकारला आहे. पुढील कार्यवाहीसाठी मुंडे यांचा राजीनामा राज्यपालांकडे पाठवला असल्याचे फडणवीस यांनी माध्यमांना सांगितले.संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाचे काल फोटो व्हायरल झाले असून राज्यभर हळहळ व्यक्त होत आहे. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्री धनंजय मुंडे यांना राजीनामा देण्यास सांगितले होते, त्यानंतर मुंडे यांच्या पीए जोशी यांनी फडणवीस यांच्याकडे मुंडे यांच्याकडे राजीनामा दिला. रविवारी रात्री धनंजय मुंडे यांच्या पत्नी करुणा शर्मा मुंडे यांनी समाज माध्यमांवर मुंडे यांच्या राजीनाम्याबाबत भाकीत केले होते. ते भाकीत खरे ठरले.मुंडेंनी राजीनामा दिल्यानंतरआरोपींना फाशींची शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी करुणा मुंडे यांनी केली



आहे. करुणा मुंडे यांनी फेसबूक पोस्ट केली होती. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दोन दिवसापूर्वी मुंडे यांचा राजीनामा घेतल्याची आपल्याला माहिती आहे, असे ठोसपणे करुणा मुंडे यांनी आपल्या फेसबूक पोस्टमध्ये म्हटलं होते. ३ मार्च रोजी राजी नामा होगा, अशी पोस्ट त्यांनी शेअर केली होती. खुनात मदत करणाऱ्यांना सहआरोपी करा, अशी मागणी विरोधकांनी विधिमंडळात केली आहे.

संतोष देशमुख हत्या प्रकरणी पोलिसांनी दाखल केलेल्या आरोपत्रामध्ये हत्येचे अनेक फोटो व व्हिडीओ जोडले आहेत. हे फोटो सोमवारी सोशल मीडियात प्रचंड व्हायरल झाले. त्यानंतर पुन्हा एकदा मुंडे यांच्या राजीनाम्याच्या मागणीने जोर धरला होता. अखेर आज त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला.

**आता मी खोदून खोदून गोष्टी बाहेर काढणार; मुंडेंच्या राजीनाम्यानंतर दमानिया आणखी आक्रमक**

अखेर अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचा राजीनामा मागवून घेतला होता. त्यानंतर स्वीय सहाय्यक प्रशांत जोशी यांच्या मार्फत मुंडे यांनी राजीनामा पाठवून दिला. या राजीनाम्यानंतर आता सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी आता तर मी आणखी गोष्टी खोदून काढणार असल्याचा इशारा दिला आहे.

राजीनामा दोन महिन्यांपूर्वीच घ्यायला हवा होता. पण आता मी गोष्टी खोदून खोदून काढणार आहे. खंडणीची बैठक धनंजय मुंडे यांच्या सातपुडा या शासकीय निवासस्थानी झाली होती. तिथले आता टॉवर लोकेशन काढून मी आता हा विषय पुढे नेणार आहे, असे दमानिया यांनी सांगितले.

# अबू आझमी निलंबित झाला पाहिजे, त्याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे; एकनाथ शिंदे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४मुंबई**

सध्या छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारीत 'छावा' चित्रपटाची सर्वत्र जोरदार चर्चा सुरु आहे. या ऐतिहासिक चित्रपटाच्या माध्यमाने छत्रपती संभाजी महाराजांनी देशासाठी आणि धर्मासाठी केलेले बलिदान अगदी कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचत आहे. चित्रपट पाहून सर्वांचेच डोळे पाणावत आहेत. त्यांचे बलिदान तरूण पिढीला प्रेणार देणारे आहे. सत्ता धाऱ्यांपासून ते अगदी विरोधकांपर्यंत सर्वचजण या चित्रपटाचे कौतुक करत आहेत. मात्र, यातच समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी औरंगजेबाचे कोतुक करत वादग्रस्त विधान केले आहे. औरंगजेबाच्या काळात भारताची सीमा अफगाणिस्तान आणि म्यानमारपर्यंत होती. जीडीपी २४ टक्के होता. हे सर्व मी चुकीचे म्हणू का? असा प्रश्न करत, छत्रपती संभाजी महाराज आणि औरंगजेबाची लढाई सत्तेसाठी होती.



धर्मासाठी नव्हती, असे अबू आझमी यांनी म्हटले होते. आझींच्या या विधानाचे पडसाद आज विधानसभेत बघायला मिळाले. 'अबू आझमींना निलंबित करण्याची आणि त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत केली.

# खुशखबर, एप्रिलमध्ये बेलोरा विमानतळावरून अमरावतीकरांना टेकऑफची सुविधा
## खासदार डॉ.अनिल बोंडे यांची माहिती डीजीसीआय परवानगी प्रक्रिया अंतिम टप्प्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

बहुप्रतिक्षित अमरावतीच्या बेलोरा विमानतळावरून अमरावतीकरांच्या टेकऑफची प्रतीक्षा संपणार असल्याची बातमी आहे. विमानतळ इमारत निर्माणसह विविध प्रकारचे काम पूर्ण झाले असून नागरी उड्डाण मंत्रालयाच्या उडाणा संदर्भातील परवानगीची प्रक्रियाही अंतिम टप्प्यात आली आहे. एप्रिलमध्ये अमरावती ते मुंबई अशी विमानसेवा सुरू होणार असल्याची माहिती राज्यसभा सदस्य डॉ.अनिल बोंडे यांनी दिली. बोंडे यांनी विमानतळ प्राधिकरणाचे अधिकाऱ्यांसोबत बैठक घेत प्रगतीत असलेल्या विमानतळाच्या कामकाजाची पाहणी देखील केली.अमरावतीच्या बेलोरा विमानतळाचे काम पूर्ण झालेले आहे. धावपट्टी, इमारत निर्माण यासह सुसज्ज विमानतळासाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधा या ठिकाणी विकसित करण्यात आलेल्या आहेत. त्या





संपूर्ण कामकाजाचा आढावा डॉ.अनिल बोंडे यांनी घेतला. यावेळी विमानतळाच्या श्रीमती चावला, भूषण जीरापुरे यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते. नागरी उड्डाण संचालनालयाकडे उड्डाणा संदर्भातील आवश्यक असलेल्या परवानगीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आलेली आहे. मार्च महिन्याच्या अखेरच्या आठवड्यात ही प्रक्रिया पूर्ण होऊन एप्रिल महिन्यात बेलोरा विमानतळावरून प्रत्यक्षात उड्डाणाला सुरुवात होणार आहे. प्रथम अमरावती ते मुंबई ७८ आसनी क्षमतेचे विमान बेलोरा विमानतळावरून टेकऑफ करणार आहे. या फ्लाईटला एटीआर असे म्हणतात. त्यामुळे लवकरच अमरावतीकरांना अमरावती वरून विमान प्रवासाची प्रतीक्षा पूर्ण होणार आहे. त्यानंतर रात्र कालीन प्रवासाची सुविधा देखील विमानतळ प्राधिकरणाकडून विकसित केली जाणार असल्याची माहिती सुद्धा डॉ.अनिल बोंडे यांनी विदर्भ प्रजासत्ताक सोबत बोलतांना दिली.

# ...त्यात आम्ही कधीही हस्तक्षेप करणार नाही; धनंजय मुंडेंची पक्षानं केली पाठराखण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४मुंबई**

संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळे वादात सापडलेल्या धनंजय मुंडे यांनी त्यांच्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे. सद्सद् विवेकबुद्धीला स्मरून आणि प्रकृतीचं कारण पुढे करून धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिल्याचं सांगितले. मुंडेंचा हा राजीनामा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वीकारला असून तो पुढील कार्यवाहीसाठी राज्यपालांकडे पाठवला आहे. त्यातच धनंजय



मुंडे यांच्या राजीनाम्याबाबत अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून पक्षाची भूमिका स्पष्ट करणारं पत्रक जारी करण्यात आलं आहे.

प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या सहीने जारी केलेल्या पत्रकात म्हटलंय की, संतोष देशमुख हत्या प्रकरणातील दोषींवर कडक कारवाई झालीच पाहिजे. बीडसह संपूर्ण राज्यभरातील आमच्या पक्षाच्या नेत्यांनी याबाबत अत्यंत ठाम भूमिका घेतली आहे. आज धनंजय मुंडे यांनी घेतलेल्या राजीनाम्याचा निर्णय हा नैतिकतेला धरून आहे. संतोष देशमुख प्रकरणाचा तपास कोणत्याही दबावाशिवाय सुरू आहे आणि तो असाच चालू राहून आरोपींना कठोरता कठोर शिक्षा व्हावी हीच आमची अपेक्षा आहे असं त्यांनी सांगितले.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पूर्वीच नैतिक मुद्द्यावर स्वत: राजीनामा देण्याचे उदाहरण निर्माण केले होते आणि या प्रकरणातही त्यांनी तशीच ठाम भूमिका घेतली होती. न्याय व्यवस्था आणि कायदा यावर आमचा पूर्ण विश्वास आहे आणि त्यांच्या कामात आम्ही कधीही हस्तक्षेप करणार नाही. न्यायाला विलंब होऊ नये यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत हाच संदेश या प्रकरणातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष देत आहे असं प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी माध्यमांना दिलेल्या पत्रकात सांगितले आहे.

# औरंगजेबाची कबर उखडून टाका, नवनीत राणा यांची अबू आझमींवर टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी औरंगजेब क्रूर प्रशासक नव्हता, असे म्हटले आहे. त्यांच्या या विधानावर अनेकांनी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. अशातच आता भाजपच्या नेत्या आणि माजी खासदार नवनीत राणा यांनी अबू आझमींच्या या वक्तव्याबद्दल संतप्त व्हिडिओ शेअर केला आहे.

अबू आझमी म्हणाले होते की, 'चुकीचा इतिहास दाखवला जात आहे. औरंगजेबाने अनेक मंदिर बनवलेली आहेत. मी औरंगजेबाला क्रूर प्रशासक मानत नाही. तसेच छत्रपती संभाजी महाराज आणि औरंगजेब यांच्यातील जी लढाई होती, ती राज्य कारभाराची होती आणि हिंदू-मुस्लिम अशी नव्हती. मी असे मानतो की, औरंगजेबाच्या काळात भारताची सीमा अफगाणिस्तानपर्यंत होती. त्या काळात आपला जीडीपी २४ टक्के एवढा होता. तेव्हा भारताला सोने की चिड़िया म्हटले जायचे. मग मी याला चुकीचे म्हणू का? तसेच छत्रपती संभाजी महाराज आणि



औरंगजेबाची लढाई ही धर्माची होती असे मी मानत नाही.' त्यांच्या या विधानानंतर अनेकांनी टीकेची झोड उठवली आहे. अबू आझमींच्या या विधानावर नवनीत राणा यांनी व्हिडिओ शेअर केला आहे. नवनीत राणा म्हणाल्या की, ज्या पद्धतीने अबू आझमींनी हे वक्तव्य केले आहे, त्यांनी एकदा जाऊन छावा चित्रपट पाहून घ्यावा. या चित्रपटामध्ये जो इतिहास दाखवला आहे आणि आजवर जे आम्ही वाचलेले आहे, त्यात छत्रपती संभाजी महाराजांवर अत्याचार करणारा हा औरंगजेब हा क्रूर राजा होता, संभाजी महाराजांच्या डोळ्यात सळई टाकणारा औरंगजेब होता, हे सर्वांना माहित आहे. ज्या प्रकारे महाराष्ट्र सरकारने औरंगाबादचे नाव बदलून छत्रपती संभाजी नगर केले, त्या सरकारने आता औरंगजेबला बाप म्हणणाऱ्या लोकांना सडेतोड उत्तर दिले पाहिजे. महाराष्ट्रात आता हिंदुत्ववादी विचारांचे सरकार आहे. ज्या व्यक्तीने छत्रपती संभाजी महाराजांवर भयंकर अत्याचार केले, त्या औरंगजेबाची कबर खुलताबाद येथून उखडून फेकून दिली पाहिजे, अशी विनंती आपण सरकारला करणार आहोत.

नवनीत राणा म्हणाल्या, जो हिंदू हिताची गोष्ट करणार नाही, त्यांना या देशात राहण्याचा अधिकार नाही. महायुतीचे सरकार औरंगजेबाची कबर उखडून फेक्कणार तर आहेच, पण ज्यांना औरंगजेबावर प्रेम आहे, त्यांनी आपल्या घरी ती कबर न्यावी, अशा शब्दात नवनीत राणा यांनी संताप व्यक्त केला आहे.

# धनंजय मुंडेंचा राजिनामा अगोदरच घ्यायला हवा होता- पशुसंवर्धनमंत्री पंकजा मुंडे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४नागपूर**

संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळे वादात सापडलेल्या धनंजय मुंडे यांच्या मंत्रीपदाच्या राजिनाम्यानंतर विविध प्रतिक्रिया येत आहेत. त्यांच्या भगिनी व राज्याच्या पशुसंवर्धनमंत्री पंकजा मुंडे यांनी या राजिनाम्याचे स्वागत करत भाजपच्या वरिष्ठांना चिमटा काढला आहे. मुळात मुंडे यांना मंत्रीपदाची शपथच द्यायला नको होती. असे झाले असले तर पुढील प्रकार टळला असता. शिवाय त्यांचा राजिनामादेखील अगोदरच घ्यायला हवा होता, या शब्दांत पंकजा मुंडे यांनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या. नागपुरात मंगळवारी त्या



प्रसारमाध्यमांशी बोलत होत्या.

धनंजय मुंडे यांचा राजिनाम्याच्या निर्णय योग्य आहे. त्याचे मी स्वागत करते योग्य निर्णय. देर आए दुरुस्त आए असेच म्हणावे लागेल. मुळात त्यांचा राजिनामा अगोदर घेण्यात यायला हवा होता, असे पंकजा मुंडे म्हणाल्या. संतोष देशमुख हत्याप्रकरण माणुसकीच्या दृष्टीने महत्त्वाचा विषय आहे. त्यांच्या हत्येबाबत काही व्हिडीओ व्हायरल झाले. मात्र ते व्हिडीओ उघडण्याची किंवा बघायची माझी हिंमतच झाली नाही. ज्यांनी त्यांना अमानुषपणे मारले व व्हिडीओ केला ते अमानवीयच म्हणावे लागतील.संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर मी मुख्यमंत्र्यांना पत्र दिले होते. यात कोण सहभागी आहे व कुणाचा हात आहे हे तपास यंत्रणेचे काम आहे. मी त्यात हस्तक्षेप करण्याचे कारण नाही. परंतु ज्या मुलांनी ही हत्या केली आहे त्यांच्यामुळे संपूर्ण राज्यातील त्यांचा समाज मान खाली घालून वावरत आहे. समाज व जात यावर तशी तर बोलायची गरज नाही. मात्र आजकाल प्रत्येक गोष्ट जातीवरच जाते. अमानुषपणे हत्या करणाऱ्या गुन्हेगाराला कुठलीही जात नसते. तसेच निर्णय घेणाऱ्या राज्यकर्त्यालादेखील जात नसते. मंत्र्यांनी कुणाबाबतही कुठलाही ममत्वभाव, आकस व द्वेष न बाळगता काम केले पाहिजे. मंत्र्यांनी खुर्चीवर बसल्यावर सर्वांचा विचार केला पाहिजे. आरोपी माझे मुलं असती तरी मी हेच म्हटले असते की त्यांना कडक शिक्षा व्हायला हवी. संतोष देशमुख यांच्या आईची मनापासून क्षमा मागते, असे प्रतिपादन पंकजा मुंडे यांनी केले.

# संतापाचा कडेलोट! धनंजय मुंडेसह संतोष देशमुखांच्या मारेकऱ्यांचे फोटो लागले मुताऱ्यांमध्ये

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४बीड**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे फोटो समोर आल्यानंतर महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. या फोटोनंतर राज्यातील अनेक सार्वजनिक मुतारींमध्ये आरोपींचे फोटो लावण्यात आले आहे.या फोटोनंतर संभाजी ब्रिगेडने राज्यभरातील मुतारींमध्ये आरोपींची फोटो लावले आहेत. यात आमदार धनंजय मुंडे यांचाही फोटोही लावण्यात आला आहे.संतोष देशमुख हत्या प्रकरणात प्रमुख आरोपी असलेला वाल्मीक कराड आणि ज्यांनी त्यांना हालहाल करून मारले, त्या सुदर्शन घुलेसह इतरांचेही फोटो लावण्यात आले आहेत.

संतोष देशमुख यांचे ९ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी अपहरण करण्यात आले होते. त्यानंतर आरोपींना त्यांना तब्बल तीन तास हालहाल करून मारले. असह्य वेदना सोसतच देशमुखांना प्राण सोडले.क्रौर्यालाही लाज वाटावी असे आरोपींनी केले. संतोष देशमुखांना नरक यातना आरोपी त्याचा आनंद घेत होते. फोटो काढत होते.संतोष देशमुख यांनी पिण्यासाठी पाणी मागितल्यानंतर आरोपीने त्यांच्या तोंडावर लघवी केली. या कृत्याचा निषेध नोंदवण्यासाठी संभाजी ब्रिगेडने आरोपींचे फोटो राज्यभरात अनेक मुतारींमध्ये लावले आहेत.

काळा रंगाच्या स्कॉर्पिओ गाडीतून संतोष देशमुखांचे अपहरण करण्यात आले. ही गाडी सुदर्शन घुले याची होती. याच गाडीतून त्यांचा मृतदेह दैठणा परिसरात फेकण्यात आला. या गाडीतच रक्ताचे डाग आणि इतर पुरावे सीआयडीला मिळाले.

## संपादकीय ......

# हेव्ही वेट सत्ताधारी हतबल विरोधक!

महाराष्ट्र विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन आजपासून मुंबईमध्ये सुरू होत आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण, मंत्री धनंजय मुंडे आणि संतोष देशमुख हत्याप्रकरणातील प्रमुख मास्टरमाईंड वाल्मीक कराड यांचे असणारे लागेबांधे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळातील विविध प्रकल्पांना तसेच विकासकामांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेली स्थगिती, नुकतेच पुणे स्वारगेट येथील एसटी स्थानकात महिलेवर झालेला बलात्कार आणि त्यामुळे राज्यातील महिलांच्या सुरक्षिततेबाबत निर्माण झालेला गंभीर प्रश्न, विधानसभा निवडणुकीच्या पूर्वी राज्य सरकारने केलेल्या लोकप्रिय घोषणांमुळे राज्य सरकारच्या तिजोरीत झालेला खडखडाट, राज्याच्या उत्पन्नात झालेली दीड ते पावणेदोन लाख कोटींची महसुली तूट यामुळे एकूणच संपन्न आणि समृद्ध समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्रासमोर उभे राहिलेले गंभीर आर्थिक संकट आणि या साऱ्यांचा राज्य सरकारच्या विकासकामांवर होत असलेला परिणाम अशा पार्श्वभूमीवर विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन हे तापण्याची चिन्हे आहेत. तथापि असे असले तरी देखील सत्ताधाऱ्यांकडे असलेले २३७ सदस्यांचे पाशवी बहुमत आणि त्यांच्यासमोर असलेले तुटपुंजे विरोधक यामुळे हेवीवेट सत्ताधारी एका बाजूला, तर हतबल आणि तुटपुंजे विरोधक दुसऱ्या बाजूला असे लोकशाहीच्या दृष्टीने चिंताजनक असलेले चित्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात पाहायला मिळणार आहे.

राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी मार्च २०२४ मध्ये विधानसभा निवडणूक होण्यापूर्वी विधानसभेत वीस हजार कोटी रुपये महसुली तूट असलेला अर्थसंकल्प मांडला होता. त्यात ८ लाख २२ हजार ३४४ कोटींच्या खर्चाची तरतूद केली होती, त्यानंतर वर्षभरात वेळोवेळी मांडलेल्या पुरवणी मागण्यांमध्ये त्यांनी पुन्हा जवळपास दीड ते दोन लाख कोटींच्या पुरवणी खर्चाला मंजूरी घेतली. मात्र आता असे समोर आले आहे की, वित्तमंत्रालयाने नियोजन करून ज्या निधीला मंजूरी दिली त्यापैकी केवळ चार लाख पन्नास हजार ७२० कोटी रुपयेच खर्चासाठी उपलब्ध करून देण्यात आले. म्हणजे नियोजित अर्थसंकल्पातील केवळ ५४ टक्के निधी खर्च झाला आहे. तरीही महसुली तूट मात्र सुमारे दोन लाख कोटींच्या घरात जाणार आहे. वित्तीय वर्षाच्या अखेरीस जादा खर्च करू नये, अशी शिफारस भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षकांनी केली होती. मात्र त्याकडे काणाडोळा करत आता काही विभागांकडून जास्तीचा खर्च करण्यासाठी नवा अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वी पुन्हा पुरवणी मागण्या मंजूरीचा घाट सरकारने घातल्याचे सांगण्यात येत आहे. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात निधी खर्च करण्यात महिला व बालविकास विभागासाठी नेहमीच्या पाच सहा हजार कोटींच्या तरतूदी ऐवजी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर शिंदे सरकारने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' आणली आणि पुरवणी मागण्यांद्वारे तरतूद वाढविण्यात आली. उपलब्ध माहितीनुसार यंदा महिला व बालकल्याण विभागाने ३४ हजार ३१६ कोटी निधीचा वापर करत अव्वल स्थान पटकावले आहे. या लाडक्या बहिणींनी केलेल्या भरघोस मतदानामुळे राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार आल्याचे जरी सांगितले जात असले तरी राज्य सरकारचे कंबरडे मात्र लाडक्या बहिणींनी चांगलेच मोडीत काढले आहे. महायुती सरकारने २०२४-२५च्या अर्थसंकल्पात ८ लाख २३ हजार ३४४ रुपयांची तरतूद केली होती. मात्र प्रत्यक्षात सर्व विभागांचा एकत्रित निधी वापर ३ लाख ५८ हजार ७६५ रुपये, म्हणजे एकूण निधीच्या केवळ ४३ टक्केच झाला आहे. यंदाचा खर्च हा गेल्या पाच वर्षांतील नीचांक ठरला आहे.राज्याच्या वित्त विभागाच्या 'बिम्स' या संकेतस्थळावर देण्यात आलेल्या माहितीनुसार गृहनिर्माण (२ टक्के), सार्वजनिक उपक्रम (४ टक्के) आणि अन्न व नागरी पुरवठा (१३ टक्के) या तीन विभागांनी निधीचा सर्वांत कमी वापर केला आहे, तर महिला व बालकल्याण विभाग (७९ टक्के) शालेय शिक्षण विभाग (७४ टक्के) इतर मागास बहुजन कल्याण (६८ टक्के) कृषी (६२ टक्के) आणि आरोग्य (६० टक्के) या विभागांनी निम्म्यापेक्षा जास्त निधी खर्च केला आहे. गेल्या पाच वर्षांत अर्थसंकल्पीय तरतुदींच्या निम्माही निधी वापरला गेला नसला तरी यंदा त्याने नीचांकी पातळी गाठली आहे. २०२३-२४ मध्ये ४८ टक्के, वर्ष २२-२३ मध्ये ४७ टक्के, वर्ष २०२१-२२ मध्ये ४७ टक्के, वर्ष २०२०-२१ मध्ये ४६ टक्के आणि वर्ष २०१९-२० मध्ये ४८ टक्के निधीचा वापर झाला होता. अर्थसंकल्पात लोकप्रिय घोषणा होतात. तरतूद १५ ते २० टक्क्यांनी वाढवल्याची चर्चा होते व महसूल वृद्धीचे कोष्टक मांडले जाते. मात्र प्रत्यक्षात ५० टक्के निधीही वापरला जात नसल्याचे वास्तव आहे.एकूणच राज्याचे आर्थिक चित्र गंभीर आहे आणि पाशवी बहुमत असलेल्या महायुती सरकारने जर राज्याच्या आर्थिक गणिताचा योग्य ताळमेळ बसवत यंदाचा अर्थसंकल्प मांडला तरच खऱ्या अर्थाने महायुती सरकारला आवश्यक खर्चाबरोबरच विकासकामांसाठी काही ना काही प्रमाणात तरी निधीची उपलब्धता होण्याची शक्यता आहे मात्र त्यासाठी विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुतीने ज्या मोठ्या खर्चिक लोकप्रिय घोषणा केल्या होत्या या घोषणांना चाप लावल्या खेरीज राज्य सरकारला विकासकामांवर खर्च करता येणे प्राप्त परिस्थितीत अशक्य आहे. राज्याचे अर्थमंत्री व उपमुख्यमंत्री अजित पवार यांना या साऱ्या गोष्टीची पूर्वकल्पना आहे आणि तसे ते कठोर आर्थिक शिस्तीचे भोक्ते आहेत.

तथापि राज्यात कठोर आर्थिक शिस्त लागू करत असताना त्याचा फटका सर्वसामान्य जनतेसाठी आवश्यक असलेल्या विकास प्रकल्पांना बसू नये याची काळजी ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच अर्थमंत्री व उपमुख्यमंत्री अजित पवार यांना या अर्थसंकल्पात घ्यावी लागणार आहे.

# देशाच्या विकासाला बळ देणारे हात

वीजेने मानवी जीवन सहज आणि सुसह्य केले आहे, किंबहुना वीजेशिवाय जगण्याची कल्पनाच करता येत नाही. बटन दाबल्याबरोबर घर प्रकाशमान व्हावं एवढीच रास्त अपेक्षा सर्वसामान्यांची आहे.परंतु या बटणामागे असलेली भलीमोठी वीजयंत्रणा आणि या यंत्रणेच्या माध्यमातून विजेचे नियंत्रण करणारे व २४ तास अखंडित वीजपुरवठा करण्यासाठी रात्रंदिवस धडपड करणारे हात म्हणजे महावितरणचे लाईनमन .



वीज वितरण क्षेत्रात महावितरण ही देशातील सर्वात मोठी सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी आहे. सुमारे ८१ हजार कर्मचारी, रक्तवाहिन्याप्रमाणे पसरलेल्या १२ लाख किलोमीटरच्या वीज वाहिन्या,४१३२ उपकेंद्रे, तसेच ८ लाख ७५ हजार ३३९ रोहित्राच्या माध्यमातून २५ हजार मेगावॅट वीज ,ही मुंबईचा काही भाग वगळता राज्यातील विविध वर्गवारीतील ३ कोटी ३ लाख ७० हजार ग्राहकांपर्यंत अखंड पोहचविण्याच काम महावितरणचा लाईनमन अविरत करत असतो.

वीजपुरवठा खंडित झाला की सर्वकाही ठप्प होते आणि वीज पुरवठा खंडित झाल्यावरच वीजेचे महत्वही कळते.परंतु गेलेली वीज परत कशी आली हे कोणी कधी जाणून घेतलं नाही किंवा तशी गरजही वाटली नसल्याने महावितरणचा लाईनमन आजवर दुर्लक्षीतच राहीला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. परंतु लाईनमनच्या कामाची दखल घेत देशभरातील लाईनमनबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी केंद्रशासनाने ४ मार्च हा 'लाईनमन दिवस ' साजरा करण्याच्या सुचना सर्व सार्वजनिक आणि खाजगी आस्थापनांना दिल्या आहेत. महावितरणमध्ये ४ मार्च हा 'लाईनमन दिन' साजरा करण्यात येत आहेत,त्यानिमित्ताने महावितरणच्या लाईनमनच्या कार्याची ओळख करून देण्याचा हा एक प्रयत्न.

सध्यातरी बंद पडलेली वीज यंत्रणा पुर्ववत करण्यासाठी प्रत्यक्ष माणुसच लागतो.त्यामुळे ठप्प झालेली किंवा रात्री- बेरात्री खंडित झालेला वीज पुरवठा पुर्ववत होतो,तथापि ते पुर्ववत करण्यासाठी त्याठिकाणी महावितरणचा लाईनमन प्रसंगी प्रतिकूल आणि धोकादायक परिस्थितीत खांबावर, रोहित्रावर चढुन काम करतो असतो,तेंव्हाच खंडित झालेली वीज पुर्ववत होते हे याठिकाणी आवर्जुन नमुद केले आहे.

वीजपुरवठा खंडित झाला की तो पूर्ववत होईपर्यंतचा प्रतीक्षा काळ हा वीजग्राहकांना नकोसा असतो, वीज दिसत नाही. वीजयंत्रणेत काम करण्याचा कितीही वर्षांचा अनुभव असला तरी विजेशी मैत्री होऊ शकत नाही. त्यामुळे एखाद्या क्षणी अनावधानाने झालेली चूकही जीवावर बेतू शकते. याची अनेक उदाहरणे देता येतील, एवढ्या धोकादायक क्षेत्रात महावितरणचा हा सैनिक आपले कर्तव्य बजावत असतो.

**फुलसिंग राठोड**
जनसंपर्क अधिकारी
महावितरण,अमरावती परिमंडल



महावितरणची उघड्यावर असलेली संपूर्ण यंत्रणा,जंगल ,दऱ्या - खोऱ्यातून आलेल्या वीज वाहिन्या,वीज खांबे,रोहित्रे इत्यादीवर उन,वादळ - वारा,पाऊस याचा मोठा परिणाम होत असतो.त्यामुळे वीज यंत्रणेची नियमित देखभाल - दुरूस्ती करतांना किंवा वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर प्रसंगी एखादा फॉल्ट शोधण्यासाठी शेकडो किलो मीटर वीज वाहिन्यांचे पेट्रोलिंग करावे लागते,पावसाळ्यात ,तर अशा आव्हानांची नियमितपणे भर पडत असते आणि महावितरणचा लाईनमन या आव्हानांना समर्थपणे पेलत असतो.

करोना सारख्या महामारीत तसेच वादळवाऱ्याच्या अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत काम करणाऱ्या लाईनमनचे कौतूक करणे हे त्यांचा आत्मविश्वास वृदिंगत करणारे आहेत.एकेकाळी फक्त पुरूषप्रधान असलेल्या या क्षेत्रात लाईन वुमनही पुरूषांच्या खांद्याला खांदा लाऊन सक्षमपणे या क्षेत्रातील आपले कर्तव्य बजावत आहेत. वीज पुरवठा सुरळीत करण्यावरच लाईमनचे काम थांबत नाही तर,विविध वर्गवारीतील वीज ग्राहकांना नविन वीज जोडणी देणे,वीजबिलाची वसुली करणे,वीज चोरी पकडणे,थकबाकीदारांचा वीज पुरवठा खंडित करणे,ग्राहकांच्या तक्रारी सोडविणे इत्यादी कामे नित्याचाच भाग असणाऱ्या महावितरणच्या या जीगरबाजाला ४ मार्च लाईनमन दिना निमित्य मानाचा मुजरा!

# उन्हाळी भाजीपाला पिकात प्लास्टिक आच्छादन कराल तर हे होतील फायदे; वाचा सविस्तर




**दि.४विदर्भ प्रजासत्ताक** - उन्हाळी हंगामात उष्ण तापमान असल्याने भाजीपाला पिकांचे पाणी व्यवस्थापन करणे ही अत्यंत आवश्यक बाब आहे.पाण्याचे व्यवस्थापन करताना साधारणतः जमिनीचा मगदूर, पिकांची वाढीची अवस्था या गोष्टींचा विचार करुन नियोजन करावे.उन्हाळी हंगामात पाणी व्यवस्थापन करताना ठिबक सिंचन, तुषार सिंचनाचा वापर केल्यास कमी पाण्यात चांगले उत्पादन मिळू शकते.

तसेच प्लास्टिक आच्छादनाचा वापर केल्यास बाष्पीभवन कमी होण्यास मदत होते व पाण्याची बचत करता येते. विशेषतः फुलधारणा ते फळे काढणीच्या काळात एकसारखा पाणीपुरवठा करणे आवश्यक आहे. पाणी शक्यतो सकाळी, संध्याकाळी अथवा रात्रीच्या वेळी द्यावे. (भर उन्हात पाणी देणे टाळावे).

उन्हाळी भाजीपाला पिकात प्लास्टिक आच्छादन कसे फायदेशीर

१) उन्हाळ्यात पाण्याची कमतरता असते अशा वेळी आच्छादनामुळे शेतात झाडांजवळील शेत जमिनीचा पृष्ठभाग झाकून ठेवता येतो.

२) त्यामुळे पाण्याची बचत व उत्पन्न वाढविण्यास मदत होते.

३) ओलावा टिकून राहिल्यामुळे २५ ते ३० टक्के पाण्याची बचत होते.

४) वायुंचे आदान-प्रदान चांगल्या पध्दतीने होऊन मुळांच्या सदृढ वाढीसाठी माती सशक्त होते.

५) बीज उगवणक्षमतेत वाढ होते.

६) प्लास्टिक आच्छादनामुळे कार्बनडायऑक्साईड वायुचे प्रमाण वाढते व प्रकाश संश्लेषणाला मदत होते.

७) गादीवाफ्यावर पाणी साचून राहत नाही व रोपांची वाढ व्यवस्थित होते.

८) आंतरमशागतीची कामे कमी होतात व खर्चात बचत होते.

९) भाजीपाला सडण्याचे प्रमाण कमी होते.

१०) वेलवर्गीय भाजीपाला पिकांमध्ये काकडी, कलिंगड, ढेमसे आणि खरबुज तसेच मिरची, वांगी, टोमॅटो या पिकांमध्ये आच्छादनाचा वापर करतात.


११) यामध्ये पॉलिथिन मल्च, गवत, पालापाचोळा इ. वापरता येते. त्यामुळे फळांचा जमिनीशी संपर्क येत नाही, खराब होत नाहीत.

१२) शिवाय जमिनीतील पाण्याचे बाष्पीभवन कमी होण्यास मदत होते आणि तणांचा बंदोबस्त होतो.










# राजकमल चौकात उड्डाण पुलावरून युवतीने घेतली उडी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती-** राजकमल चौक येथील उड्डाण पुलावरून सोमवारी (ता. तीन) रात्री ११:४५ वाजता एका षोडशीने तब्बल वीस फूट उंचावरून उडी घेत आत्महत्येचा प्रयत्न केला. या घटनेने परिसरात एकच धावपळ उडाली.शहराचे हृदयस्थान असलेल्या राजकमल चौकातील वर्दळ जेमतेम सामान्य होत असतानाच ही घटना घडली. मुलीने उड्डाणपुलावरून घेतल्याचे लक्षात येताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळाकडे धाव घेतली. सुरुवातीला अपघात झाला की उडी घेतली, हेच नागरिकांना कळत नव्हते. मात्र त्या मुलीने उड्डाणपुलावरून उडी घेतल्याचे काही प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. ही घटना पाहण्यासाठी नागरिकांची तोबा गर्दी उसळली होती. परिणामी चौकातील वाहतूकसुद्धा खोळंबली होती. घटनेची माहिती मिळताच कोतवाली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर मुलीला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. संबंधित १६



वर्षीय मुलगी ही बेलपुरा-हमालपुरा या भागातील रहिवासी असल्याची प्राथमिक माहिती उपलब्ध झाली. मुलीने नेमकी कोणत्या कारणावरून उड्डाण पुलावरून उडी घेतली ते अद्याप समजू शकले नाही. पोलीस संबंधित मुलीची ओळख पटविण्याचा प्रयत्न करीत होते.




## रोज नियमितपणे ताक प्या! वजन कमी होण्यासोबतच मिळतील ८ जबरदस्त फायदे- सौंदर्यही खुलेल

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक** - वातावरणातील उष्णता वाढायला आता सुरुवात झाली आहे. त्यामुळे थंडगार पेयांची आठवण आता यायला लागते. पन्हं, लिंबू सरबत, ताक अशा पदार्थांमुळे उन्हाळा सुसह्य होऊन जातो. या घरगुती पेयांपैकी ताकाचे महत्त्व आता आपण पाहूया. उन्हाळ्यात तर नियमितपणे ताक प्यायलाच हवं, पण एरवीसुद्धा सकाळी नाश्त्यामध्ये किंवा दुपारच्या जेवणात ताक घेत जावं, असा सल्ला आयुर्वेदतज्ज्ञ देतात. दह्यापेक्षाही ताक पिण्याचे अनेक फायदे आहेत. शिवाय तुम्ही तिन्ही ऋतुंमध्ये ताक घेतलं तरी ते बाधत नाही. शिवाय ताक हे कफ, वात, पित्त अशा सगळ्याच प्रकृतीच्या लोकांना चालतं ताक नियमितपणे प्यायल्यामुळे शरीराला काय फायदे होतात ते आता पाहूया....



१. ताक प्यायल्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते.

२. ताकामधून चांगल्या प्रमाणात व्हिटॅमिन बी १२ तसेच कॅल्शियम मिळते.३. शाकाहारी लोकांसाठी ताक हा प्रोटीन्सचा खूप चांगला स्त्रोत मानला जातो.

४. हिरड्या बळकट होण्यासाठी तसेच हिरड्यांमधून रक्त येत असेल तर तो त्रास कमी करण्यासाठीही ताक पिणे फायदेशीर ठरते. वारंवार तोंड येत असेल तर काही दिवस ताकाच्या गुळण्या करून पाहा. बरं वाटेल.

५. डोक्यातला वाढता कोंडा कमी करण्यासाठीही ताक उपयुक्त ठरते. तुमच्या रोजच्या जेवणात तर ताक घ्याच, पण आठवड्यातून एकदा डोक्यालाही लावा. कोंडा कमी होईल.

६. त्वचा अधिक चांगली, नितळ आणि तरुण राहण्यासाठीही ताक पिणे उपयुक्त ठरते.

७. खूप गळून गेला असाल, थकवा येऊन अशक्तपणा जाणवत असेल तर ग्लासभर ताक प्या. लगेच एनर्जी येईल. ८. मुळव्याधीचा त्रास असणाऱ्यांनाही ताक पिणं फायदेशीर ठरतं.

# हजारो लोकांचे उत्पन्न थांबणार, नंबर प्लेट दुकानदारांनी काय करायचे?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती-** राज्य सरकारने सर्वच वाहनांना हाय सिक्युरिटी नंबर प्लेट अनिवार्य केली आहे. यासाठी जादा दर आकारत असल्याचे आणि गुजरातच्या कंपनीला कंत्राट दिल्याचे आरोप होत असताना या नंबर प्लेटची आणखी एक काळी बाजू समोर येत आहे. या एचएसआरपी नंबरप्लेटमुळे हजारो लोकांचा रोजगार बुडणार आहे.

नंबर प्लेट बनविणारे, रेडिअम कोरणारे तसेच या व्यवसायाशी संबंधीत अनेक लोकांना त्यांचा व्यवसाय बंद करावा लागणार आहे. प्रत्येक शहरात, तालुक्याच्या ठिकाणी असे अनेक नंबरप्लेट बनवून देणारे लोक काम करत होते. २०१९ पासूनच्या वाहनांना एचएसआरपी नंबरप्लेट लावली जात होती. परंतू त्यापूर्वीच्या वाहनांना जुनीच रेडिअमवाली नंबरप्लेट होती. या वाहनांची संख्या जास्त असल्याने या लोकांना काम मिळत होते. ते आता बंद होणार आहे.

सरकारन काही कंपन्यांना कंत्राट दिले आहे. त्यांनी आपापले एजंट नेमले आहेत. त्यांच्याकडूनच रजिस्टर करून तुम्हाला एचएसआरपी नंबर प्लेट बनवून घ्यायची आहे. इतरत्र कुठेही ही नंबर प्लेट बनवून मिळणार नाही. तसेच ही नंबरप्लेट त्याच एजंटकडून लावून




मिळणार आहे. या नंबरप्लेटला स्क्रू नसल्याने ती कायमस्वरूपी न काढता येणाऱ्या स्क्रूला जोडली जाणार आहे. सुरक्षेच्या दृष्टीने या गोष्टी करण्यात येत असल्या तरी हजारो लोकांच्या पोटावर पाय येणार आहे.

अनेक नंबर प्लेट बनवून देणाऱ्या दुकानदारांचे संसार उघड्यावर पडणार आहेत.अनेकांनी कर्ज घेतलेली आहे, मुले शिक्षण घेत आहेत. अचानक आपला रोजगार जाणार असल्याने हे सर्व कसे भरायचे, घर कसे चालवायचे असा प्रश्न आता या नंबर प्लेट व्यावसायिकांसमोर उपस्थित होत आहे. गेली कित्येक वर्षे ते हाच व्यवसाय करत आहेत. त्यांनी जी यंत्रे घेतली आहेत ती बिनकामी ठरणार आहेत. सरकारने या एचएसआरपी नंबर प्लेट बनविण्याचे काम आम्हाला द्यावे अशी मागणी नंबर प्लेट व्यावसायिकांनी केली आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. ४ मार्च २०२५

शहर/ग्रामिण


# मोटरसायकलने जात असलेल्या युवकावर वाघाचा हल्ला, युवकाचा घटनास्थळीच दुर्दैवी मृत्यु



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती :**

मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील अरण्यानजीक वसलेल्या आदिवासींच्या वस्त्यांमध्ये कधी वाघाचा तर कधी बिबट्याचा शिरकाव झाल्याच्या घटना अनेकदा समोर येतात.दरम्यान, मासे विकून मोटरसायकलने आपल्या गावी परत जात असलेल्या आदिवासी युवकावर दबा धरून बसलेल्या वाघाने हल्ला केला. यात त्याचा मृत्यू झाला. चिखलदरा तालुक्यातील खोंगडा बीट अंतर्गत घडलेल्या या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

विनोद छोटेलाल चिमोटे (३५, रा. केली, ता. चिखलदरा), असे वाघाच्या हल्लयात ठार झालेल्या युवकाचे नाव आहे. विनोद याचा मासेविक्रीचा व्यवसाय होता. विनोद हा काल जामली आर येथे मासे विकण्यासाठी आला होता. काल रात्री आठ ते नऊच्या सुमारास एमएच २७ / बीजे ९०५९ क्रमांकाच्या मोटरसायकलने तो आपल्या गावाकडे केली येथे परत जात असताना वाघाने त्याच्यावर हल्ला केला, त्यात त्याचा मृत्यू झाला.त्याचा मृतदेह रात्रभर मुख्य रस्त्यापासून अर्धा ते एक किलोमीटर अंतरावर जंगलात पडून होता. त्याच्या शरीराचे लचके वाघाने तोडल्याचे स्पष्टपणे दिसून आला. वन विभागाच्या कर्मचाऱ्यांना आज सकाळी त्याचा मृतदेह आढळला. वनविभागाचे कर्मचारी सकाळी जंगल गस्तीवर असताना त्यांना रस्त्यावर मोटरसायकल दिसली.

यावरून त्यांना संशय आला. नंतर त्यांनी शोध सुरू केला. काही अंतरावर जंगलामध्ये युवक मृतावस्थेत दिसून आला. त्यांनी याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिली तसेच चिखलदरा पोलिसांना दिली. त्यानंतर विभागीय वन अधिकारी यशवंत बहाडे, वनपरिक्षेत्र अधिकारी अभय चंदेल, चिखलदराचे पोलीस निरीक्षक प्रशांत मसराम यांच्यासह इतर अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन मृतदेहाची पाहणी केली. त्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला. या घटनेने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### मोटरसायकल आढळल्याने शोध

सोमवारीसकाळी आमचे वनरक्षक प्रदीप धांडे व कर्मचारी जंगल वस्तीवर असताना त्यांना एक मोटरसायकल दिसून आली यावरून त्यांना संशय आला. त्यांनी शोध घेतला असता वन खंड क्रमांक ९५२ मध्ये खोंगडा बीट अंतर्गत विनोद छोटेलाल चिमोटे (वय ३५ रा. केली) या युवकाचा मृतदेह आढळून आला. त्याच्या शरीराचा भाग वन्य प्राण्याने खाल्लेला असावा, असे दिसून आले. वैद्यकीय तपासणी अहवाल आल्यानंतर त्याच्या नातेवाईकांना मोबदला देण्यात येईल. पुढील तपास सुरू आहे, अशी माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी अभय चंदेल यांनी दिली.

# सौरभ कटियार, संजिता महापात्र यांना 'बालस्नेही पुरस्कार' प्रदान




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती**,महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगातर्फे 'बालस्नेही पुरस्कार २०२४' अंतर्गत उत्कृष्ट जिल्हाधिकारी म्हणून जिल्हाधिकारी सौरभ कटीयार यांना बाल हक्कांसाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल आज मुंबई येथे गौरविण्यात आले. यशवंतराव चव्हाण सेंटर येथे हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, डॉ. पंकज भोयर, आमदार संजय केळकर, मनिषा कायंदे, प्रशांत नारनवरे, पोलिस अपर महासंचालक अश्वती दोरजे, राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्ष सुशीबेन शहा यांच्या उपस्थितीत त्यांना गौरविण्यात आले. जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यात बालकांच्या हक्कांसाठी अनेक प्रभावी योजना राबवण्यात आल्या आहेत. विशेषतः बालविवाह प्रतिबंध, बालकामगार निर्मूलन आणि शिक्षण हक्कांच्या अंमलबजावणीसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने पुरस्कारासाठी निवड केली. जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी, हा पुरस्कार संपूर्ण टीमच्या एकत्रित प्रयत्नांचे फळ आहे. आम्ही भविष्यातही बालकांच्या कल्याणासाठी कार्यरत राहू, अशी प्रतिक्रिया पुरस्कार स्विकारल्यानंतर दिली. पुरस्काराबद्दल जिल्हा प्रशासन आणि नागरिकांनी जिल्हाधिकारी श्री. कटियार यांचे अभिनंदन केले आहे.जिल्हाधिकारी सौरभ कटियार व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यपालन अधिकारी संजितामहापात्र यांच्या नेतृत्वाखाली अमरावती जिल्ह्यात बालकांच्या हक्कांसाठी अनेक प्रभावी योजना राबवण्यात आल्या आहेत. विशेषतः बालविवाह प्रतिबंध, बालकामगार निर्मूलन आणि शिक्षण हक्कांच्या अंमलबजावणीसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने पुरस्कारासाठी निवड केली. हा पुरस्कार संपूर्ण टीमच्या एकत्रित प्रयत्नांचे फळ आहे. आम्ही भविष्यातही बालकांच्या कल्याणासाठी कार्यरत राहू, अशी प्रतिक्रिया पुरस्कार स्विकारल्यानंतर जिल्हाधिकारी सौरभ कटीयार यांनी दिली.

# अंबादेवी मंदिरासमोर सजत आहे नवसाची होळी



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती–**होळी हा आनंदाचा आणि रंगांचा सण असून फाल्गुन महिन्यात होळी दहन केलं जातं. परंतु, अमरावती शहराची ग्रामदैवत असणाऱ्या श्री अंबादेवी मंदिरासमोर महिनाभर आधीच माघ पौर्णिमेला होळी उभारली जाते. या होळीत महिनाभर नवसाचे नारळ रचले जातात आणि ओटी भरली जाते. 'नवसाची होळी' अशी ओळख असणाऱ्या या होळीची परंपरा अनेक वर्षांपासून सुरू आहे. दरवर्षी माघ पौर्णिमेला : अंबादेवी मंदिरासमोर होळी – उभारली जाते. जळताना वातावरण प्रसन्न करणारं आणि औषधी गुण असणारा धूर वातावरणात पसरविणाऱ्या हेटीच्या झाडाचं खोड मध्यभागी उभारलं जातं. यानंतर या होळीत शास्त्रोक्त विधीद्वारे नारळ, शेणाचा गोवऱ्या रचल्या जातात. गाठी देखील वाहिली जाते. काही लाकडं या

**महिला वाहतात ओटी–नारळ**

होळीत उभारली जातात. यावर्षी १२ फेब्रुवारीला ही होळी संपूर्ण धार्मिक विधीसह उभारण्यात आली आहे, अशी माहिती अंबादेवी मंदिर संस्थांचे सचिव रवींद्र कर्वे यांनी दिली. १३ मार्च, फाल्गुन पौर्णिमेला सायंकाळी सूर्यास्तवेळी विधीद्वारे होळी पेटवली जाते. होळीला देवी मानलं जातं. मंदिर संस्थांच्यावतीनं खणा नारळाची ओटी भरली जाते. यावेळी शेकडो भाविक होळीमध्ये नारळ अर्पण करतात. सायंकाळी संपूर्ण विधीसह होळी पेटवली जाते, असे ही रवींद्र कर्वे म्हणाले.माघ पौर्णिमेपासून अंबादेवी मंदिरासमोर होळी रचण्यात आली आहे. या होळीला महिला ओटी आणि नारळ वाहण्यासाठी रोज येत आहेत. महिला आपल्या इच्छा पूर्ण व्हाव्यात यासाठी होळीला ओटी भरून नवस करतात. यासह ज्यांच्या इच्छा पूर्ण होतात, त्या महिला देखील होळीची ओटी भरतात आणि नारळ अर्पण करतात.होळीच्या दिवशी घरात अनेक काम आल्यानं महिलांना होळीच्या दिवशी येणं शक्य होत नाही. त्यामुळं महिला आधीच आपल्या नवसाची ओटी आणि नारळ वाहतात. सव्वाशे वर्षांपासून ही प्रथा सुरू असल्याची नोंद श्री अंबादेवी मंदिर संस्थेत आहे. कदाचित त्यापूर्वीपासून होळीची ही प्रथा सुरू असावी, असं रवींद्र कर्वे यांनी सांगितले.

# डाबका-33 केव्ही उपकेंद्रात अग्नितांडव

## शासनाचा कोट्यवधी रुपयांचा सौरऊर्जा प्रकल्प जळून खाक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४मेळघाट–**

तालुक्यातील डाबका रेल्वे नावाने प्रसिद्ध असलेल्या डाबका-३३ केव्ही उपकेंद्रात सोमवारी (दि.३) सकाळी १० वाजताच्या सुमारास अचानक लागलेल्या आगीमुळे कोट्यवधी रुपयांच्या सौर उर्जा प्रकल्पाच्या पाट्या जळून त्याची राखरांगोळी झाली. डाबका रेल्वे येथील ग्रामस्थांच्या मदतीने आणि धारणी नगरपंचायतच्या अग्निशमन दलाच्या मदतीने वेळीच आगीवर नियंत्रण मिळविण्यात आले. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या उपविभाग धारणी अंतर्गत येणाऱ्या ३३ केव्ही डाबका उपकेंद्रात सोमवारी सकाळी १० वाजताच्या सुमारास अचानक आग लागली, उपकेंद्र परिसरामध्ये सर्वत्र गवत आणि कचऱ्याचे ढिगारे असल्याने क्षणातच आगीने रौद्ररूप धारण केले. आग लागल्याचे दिसताच डाबका येथील ग्रामस्थांनी उपकेंद्राकडे धाव घेतली आणि मिळेल त्या साधनांच्या मदतीने आग विझविण्याचा प्रयत्न केला. अवघ्या चार ते पाच वर्षांपूर्वी शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या निधी अंतर्गत येथे सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी आणलेल्या प्लेट होत्या. काही प्लेट या आगीमध्ये जळाल्याची माहिती आहे. डाबका येथील ३३ केव्ही उपकेंद्र गेल्या बराच दिवसांपासून बेवारस अवस्थेमध्ये आहे.

### कोट्यवधी रुपयांच्या सौरऊर्जा प्रकल्पाचा मुहूर्त निघेना

डाबका येथील स्थानिक ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, चार ते पाच वर्षांपूर्वी शासनाने डाबका ३३ केव्ही उपकेंद्रात सौरऊर्जा प्रकल्पाला मंजुरात देऊन प्रकल्पाची उभारणी केली होती. मात्र प्रकल्प उभारणीकरिता कंत्राट मिळालेल्या कंपनीच्या हलगर्जीपणामुळे आणि संबंधित विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे हा प्रकल्प आजपर्यंत सुरू झालेला नाही. या सौरऊर्जा प्रकल्पाच्या माध्यमातून डाबका परिसरातील जवळपास ३० गावातील विद्युतचा प्रश्न मिटणार होता.

# राज्यभरातील 3 हजारावर कर्मचारी संपावर

## आजपासून समग्र शिक्षा अभियानाचे काम बंद आंदोलन

### आझाद मैदान येथे उपोषणाला सुरवात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती**

मागील १८ ते २५ वर्षांपासून तुटपुंज्या मानधनावर सेवा देणाऱ्या समग्र शिक्षा अभियानातील कंत्राटी कर्मचाऱ्यांनी सेवेत कायम करण्याच्या प्रमुख मागणीसाठी ४ मार्च पासून पासून मुंबईतील आझाद मैदानावर बेमुदत काम बंद आंदोलन आणि आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

शासनाने अनेक विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम केले असताना, समग्र शिक्षा अभियाना तील अर्धे कर्मचारी नुकतेच कायम केले आहेत. आतापर्यंत आलेल्या सर्व शासनाकडे संघटनेने कायमची मागणी रेटली आहे. परंतु फक्त आश्वासन मिळाली असल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. प्रत्यक्षात निर्णय काहीच झाले नाही, वारंवार आंदोलने, निवेदने आणि मागणीनंतरही शासनाने फक्त अभ्यास समिती गठीत करण्याचा निर्णय घेतला. मात्र, सहा महिने उलटूनही या समितीची एकही बैठक न झाल्याने कर्मचाऱ्यांच्या संयमाचा बांध तुटला आहे. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्यभरातील ३ हजारांवरआंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्यभरातील ३ हजारांवर कर्मचारी मुंबईकडे रवाना झाले. अनेक कर्मचाऱ्यांचे आकस्मिक निधन झाले, मात्र त्यांच्या कुटुंबियांना कोणतीही मदत मिळालेली नाही. आता या कर्मचाऱ्यांनी संघर्षाचा मार्ग स्विकारला असून, शासनाने त्वरित निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा दिला आहे.

### अमरावती वरून निघाले कर्मचारी

मागील शासनाच्या काळात झालेल्या कॅबिनेट बैठकीत याच विभागातील अर्धे कर्मचारी कायम करण्याचा निर्णय त्यावेळीच्या शासनाने घेतला आहे, राहिलेले अर्धे कर्मचाऱ्यांना ही शासन सेवेत कायम करून समान न्याय शासनाने करावा अशी मागणी या कर्मचाऱ्यांची आहे.

# वलगाव पोलीस ठाण्यात जमा असलेल्या दुचाकी व चारचाकी मालकांनी संपर्क करावा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती–**

अमरावती शहर पोलीस आयुक्त हद्दीत असलेल्या वलगाव पोलीस ठाणे येथे गेल्या दहा ते बारा वर्षांपासून अनेक दुचाकी व चारचाकी वाहने वलगाव पोलीस ठाणे आवारात बेवारस स्थितीत पडुन आहेत सदर वाहनांचा जाहीर लिलाव करण्याची प्रकीया सुरू होणार आहे मूळमालकांनी आपल्या वाहनांचे कागदपत्रे घेऊन वलगाव पोलीस ठाणे येथे दिनांक ३१ ३ २०२५ या तारखेपर्यंत हजर राहावे दुचाकी व चारचाकी वाहनांची नंबर दिले आहे ज्यांची वाहने असतील त्यांनी आपली वाहने घेऊन जावी अन्यथा पोलीस प्रशासन जबाबदार राहणार नाही एम एच ३१ एम ४५६२ एम एच ३१ एम ६३३४ एम एच ४५ ६३२५ एम एच २८ बी ५७४३ एम एच ०४ एस २६९३ एम एच २२ ११८७ एम एच २७ एच ५४३० एम एच २७ ऐ आर ३८२७ एम एच ३० ऐ बी २११३ एम एच ०१ ए वी ९३२९ एम एच २६ एच २४१२ एम एच १६ ऐ ई ५४१७ एम एच ०२ ए वी ८६३ एम एच २७ सी ०९९ एम एच २७ एन जी ५३३१ एम एच २७ ई ८९२६ एम एच २७ झेड ६३४४ एम एच २७ ई २९२४ एम एच २७ क्यु ४१८३ एम एच डब्ल्यू १८०९ एम एच २७ जे ४४९५ एम एच २७ आर ३४७३ एम एच २७ ऐ एन ४६१३ एम एच २७ ई ६१५९ एम एच २७ के २३३५ एम एच २७ एस ५८०१ एम एच २७ ६०२८ एम एच २७ जी ६९७७ एम ऐ २७ बी ९१०१ एम एच २७ ई ३२५६ एम एच



२७ जे २५७० एम एच २७ ऐन ६५७९ एम एफ झेड ३३४७ एम एच २७ एम २२४६ एम एच २७ बी एस ८९१५ एम एच २७ एस ३४५४ एम एच २७ ७५६३ एम एच २७ एम ५३५१ एम एच २७ ९६ एम एच २७ बी के ३७१७ एम एच २७ ई ४८५६ एम एच २७ ऐ ई २०९७ एम एच २७ सी ६६५२ एम एच २७ ऐ १६८७ एम एच २७ ऐ डी ६५४२ एम एच २७ झेड १४५७ एम एच २७ आर ७२५६ एम एच ऐ जे ११३५ एम एच २७ ऐ युव्ह ८८७५ एम एच २७ ऐ क्यु ८९७५ एम एच २७ ऐ व्ही ५८०६ एम एच २७ सी क्यु ७२७५ एम एच २७ डी ८१४८ एम एच २७ बी सी ७७२१ एम एच २७ आर ५३८८ एम एच २७ बी टी २०८० एम एच २७ बी ३७११ एम एच २७ ऐ जी १८२९ एम एच २७ के ५८८३ एम एच २७ ऐ एच ३५९५ एम एच २७ ऐ व्ही ७९७८ एम एच २७ ऐ क्यु ५७८९ एम एच २७ सी टी ७१२१ एम एच २७ जी ६३०० एम एच २७ बी आर ४७५१ एम एच २७ जे ५५१४ एम एच २७ आर ६२८९ एम एच २७ बी सी ८१६२ एम एच २७ सी क्यु ६२५१ एम एच २७ ऐ बी ८०२४ एम एच २७ डब्ल्यू ८७०७ एम एच २७ ऐ झेड १८६५ एम एच २७ व्ही ३०२० एम एच २७ ऐ एच ९५२४ एम एच २७ डी बी ७६३५ एम एच २७ ऐ एल ३०९४ एम एच २७ डी सी १६४३ एम एच ०४ एन डी ६२०९ एम एच ३१ सी एफ ११९४ एम एच ३१ बी डब्ल्यू ११९३ एम व्ही जे २३७ एम पी २८ ५५१४ एम एच डी ९११५ एम एच २९ डब्ल्यू ६५५७ एम एच १४ झेड ९४०८ एम एच ३३ एच ०७०३ एम एच ३१ एक्स ९९९३ एम एच ३० ऐ जी ६०२० एम एच २९ ऐ बी ३३२० पी बी ०५ क्यु २७०२ एम ऐ आय १६७६ एम एच ३० ऐ जे ७९५९ एम एच ३१ डी एम ४३३७ एम एच २९ एल ६६०८ एम एच २७ बी एल ४७७७ एम एच ३० एन ९५३४ एम एच २७ सी डी ३१८५ एम एच ३७ एफ ७७२९ एम एच ०४ सी एक्स १९८९

# बीड बंद! संतोष देशमुख हत्येच्या फोटोनं संताप
# १७ मार्चपर्यंत 'मनाई हुकूम जारी', सरकारचा आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४बीड** – मराठा-ओबीसी आरक्षण वाद, संतोष देशमुख हत्याकांड यामुळे गेल्या काही महिन्यापासून बीड चर्चेत आलं आहे. बीडमधील गुन्हेगारी, राजकीय मोर्चे आणि त्यात २ समाजात असलेला तणाव पाहता जिल्ह्यात कायदा सुव्यवस्थेची परिस्थिती बिघडू शकते. त्यातच ३ तारखेला संतोष देशमुख हत्याकांडाचे अनेक फोटो सोशल मीडियावर व्हायरल झालेत. त्यातून संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर खबरदारी म्हणून बीडमध्ये अपर जिल्हादंडाधिकारी यांनी मनाई हुकूम जारी केला आहे. जिल्ह्यात मराठा, ओबीसी, धनगर समाजाच्या वतीने आरक्षण मागणी आंदोलने सुरू आहेत. केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्येतील आरोपींना कठोर शासन व्हावे यासाठी आंदोलन सुरू आहे. यासह इतर बाबींमुळे अचानक घडणाऱ्या घटनांवरून तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी ३ ते १७ मार्च या कालावधीसाठी बीडमध्ये मनाई हुकूम जारी केला आहे. त्यात संतप्त लोकांनी आज बीड जिल्हा बंदची हाक दिली आहे.

दरम्यान, संतोष देशमुख यांच्या हत्येनंतरचे फोटो समाजमाध्यमात मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. त्यामुळे प्रशासनाने ही खबरदारी घेतली आहे. दुसरीकडे राज्यात धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची जोरदार मागणी होऊ लागली आहे. धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा यासाठी सरकारवर दबाव वाढला आहे. रात्री उशिरा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात धनंजय मुंडे यांच्याबाबत चर्चा झाली आहे. धनंजय मुंडेंनी राजीनामा द्यावा असं मुख्यमंत्र्यांनी सांगितल्याचे वृत्तही माध्यमांमध्ये झळकलं आहे.

**'या' सर्व गोष्टींवर असणार बंदी**



महाराष्ट्र पोलीस कायदा ३७(१)(३) अन्वये काढणाऱ्या आलेल्या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलन, धरणे आंदोलन यासारख्या ५ किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगीशिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील.

शस्त्रे, सोटे, काठी, तलवार, बंदूक जवळ बाळगता येणार नाहीत. काठ्या लाठ्या शारीरिक इजा होण्यास कारणीभूत ठरतील, सहज हाताळता येतील अशा वस्तू जवळ ठेवता येणार नाहीत.

कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटके जवळ बाळगता येणार नाहीत. दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे फोडायची किंवा फेकायची उपकरणे साधे गोळा करून ठेवता येणार नाहीत, ते बाळगता किंवा तयारही करता येणार नाहीत. आवेशी भाषणे, अंगविक्षेपण, विडंबानात्मक नकला करता येणार नाहीत. सभ्यता, नीतिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षा धोक्यात येईल किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणत्याही वस्तू जवळ ठेवता येणार नाहीत. जाहीरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणं, वाद्य वाजवणे, कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मूल्यांच्या विरूद्ध असेल किंवा देशाचा मान, सार्वभौमत्व यांना इजा पोहचवणारी असेल तर ते कृत्य करता येणार नाही. सार्वजनिक सुरक्षा, सामाजिक सलोख्याला हानी पोहोचवणारी, जाहीरपणे प्रक्षोभक भाषण व असभ्य वर्तन करता येणार नाही. व्यक्तींच्या किंवा शवाच्या किंवा त्यांच्या प्रतिमा याचे प्रदर्शन करणार नाहीत.

# कोरटकर नागपुरातच? पत्नीमार्फत मोबाईल, सीमकार्ड पोलिसांच्या स्वाधीन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४नागपूर** – छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याविषयी आक्षेपार्ह बोलून इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांना अश्लिल शिवीगाळ करणाऱ्या तथाकथित पत्रकार प्रशांत कोरटकर याची पत्नी पल्लवी यांनी सायबर पोलीस ठाण्यात पतीचा भ्रमणध्वनी आणि सीमकार्ड पोलिसांच्या स्वाधीन केले.



आरोपी प्रशांत कोरटकरची पत्नी पल्लवी यांनी प्रशांतने वापरलेला मोबाईल आणि सीमकार्ड सायबर पोलीस ठाण्यात आणून दिले. पोलिसांनी पंचनामा करुन जप्तीची कारवाई केली. आता कोरटकरचे मोबाईल आणि सीमकार्ड हे कोल्हापूर पोलिसांना सोपविण्यात येणार आहे. त्यासाठी नागपूर पोलिसांचे पथक मंगळवारी कोल्हापूरला रवाना होणार आहे.

– **लोहित मतानी**, पोलीस उपायुक्त, साबयर क्राईम विभाग

नागपूर पोलिसांचे एक पथक मंगळवारी कोल्हापूर पोलिसांच्या ताब्यात देणार आहे. फरार असलेला कोरटकर हा पोलिसांच्या हाती लागत नाही, मात्र, त्याचा भ्रमणध्वनी पोलीस ठाण्यात आणून दिल्या जातो, यावरुन नागपूर पोलिसांच्या भूमिकेवर संशय निर्माण झाला आहे. कोरटकर हा नागपुरातच लपून बसल्याची चर्चा असून पोलीस मुद्दामुन त्याला ताब्यात घेत नसल्याची चर्चा आहे.

इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांनी नुकतेच 'छावा' चित्रपटावर आपली भूमिका मांडली होती. त्यांनी ब्राह्मण समाजाचा द्वेष केल्याचा आरोप करीत तथाकथित पत्रकार प्रशांत कोरटकर याने फोन करून थेट धमकी दिली. याबाबत सावंत यांनी फोनवरुन झालेला संवाद फेसबुकवर पोस्ट केली आहे. ज्यामध्ये जिथं असाल तिथे येऊन ब्राह्मणांची ताकद दाखवू, तुम्ही कितीही मराठे एकत्र करा, असे म्हणत या कोरटकर यांनी सावंतांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ आणि घरात येऊन मारण्याची दिली धमकी दिली आहे.तसेच कोरटकर याने राष्ट्रमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज यांच्याबद्दल वादग्रस्त वक्तव्य केले, या प्रकरणी कोल्हापुरातील जुना राजवाडा पोलीस ठाण्यात प्रशांत कोरटकरविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. ज्या मोबाईलवरुन धमकी देण्यात आली किंवा ज्या मोबाईल क्रमांकावरुन धमकी देण्यात आली, तो मोबाईल आणि सीमकार्ड पोलिसांना जप्त करायचे होते.

# ऐनवेळी धारणीतील दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी बदलले परीक्षा केंद्र

## इंग्रजी माध्यमांना अभयदान, मराठी माध्यमांवर करडी नजर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि६धारणी** : फोटोदहावीच्या इंग्रजी विषयाच्या पेपरला धारणीतील एकमेव केंद्रावर तिन्ही माध्यमांचे विद्यार्थी एकत्र आल्यानंतर इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी ऐनवेळी परीक्षा केंद्र बदलण्यात आले. मात्र, त्यानंतर त्या केंद्राकडे लक्षच दिले नसल्याचा पालकांचा आक्षेप आहे. परीक्षा केंद्र बदलल्याचे शेवटच्या क्षणी सांगितल्याने विद्यार्थ्यांचीही तारांबळ उडाली.

तालुक्यात दहाव्या वर्गाच्या परीक्षेकरिता धारणी येथील एकमेव जिल्हा परिषद माजी शासकीय शाळा वकनिष्ठ महाविद्यालय हे परीक्षा केंद्र आहे. या केंद्रात ब्रिलियंट इंग्लिश स्कूल, किड्स केअर कॉन्व्हेंट स्कूल आणि मोंटफोर्ड कॉन्व्हेंट स्कूल (कुसुमकोट खुर्द) या शाळेतील विद्यार्थी परीक्षा देत आहेत. इंग्रजी विषयासाठी इंग्रजी, मराठी आणि सेमी इंग्रजी अशा तिन्ही माध्यमातील विद्यार्थी एकाच दिवशी परीक्षेला आले. परीक्षा केंद्रावर त्यांना सामावून घेण्याची सोय नसल्यानेच तिन्ही कॉन्व्हेंट शाळेतील १७८ विद्यार्थ्यांना स्थानिक जयस्तंभ चौक येथील ज्ञान मंदिर कन्या शाळेच्या परीक्षा केंद्रावर जाण्यास सांगितले. तेथे विद्यार्थ्यांना आपले आसन क्रमांक मिळत नसल्यामुळे चांगली तारांबळ उडाली होती. या केंद्राकडे कोणत्याही केंद्रसंचालकाने फेरफटका मारला नाही. त्यामुळे या प्रकरणाकडे शिक्षणाधिकारी यांनी लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

# धामणगावात ८ मार्चपासून रंगणार 'रंगरंगीला फाल्गुन मेळा'

## खाटू नरेश श्री श्यामबाबांचा प्रकट उत्सव;पाच दिवसीय धार्मिक विधी आणि भजन संध्या

### श्री बालाजी-खाटू श्याम सेवा समितीचे दहावे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४धामणगाव रेल्वे,**

राजस्थानमधील जयपूरपासून सुमारे ८० किमी अंतरावर असलेल्या कोट्यवधी भक्तांच्या श्रद्धेचे केंद्र असलेल्या खाटूधामच्या कलियुग अवतारी श्री श्यामबाबांचा पाच दिवसीय रंगरंगीला फाल्गुन मेळा ८ मार्च ते बुधवार, १२ मार्च कालावधीत हजारो भक्तांच्या उपस्थितीत साजरा होणार आहे. या मेळ्यात धार्मिक विधींप्रमाणेच मनोरंजनासाठी प्रदर्शन (अम्युझमेंट पार्क), विविध झुले आणि चविष्ट खाद्यपदार्थांचे स्टॉल असतील. भव्य मेळ्याचा धार्मिक सोहळा खाटू नरेश श्री श्यामबाबांच्या प्रकट उत्सवानिमित्ताने, येथील सेफला हायस्कूलसमोर असलेल्या जे. बी. पार्क येथील श्री बालाजी-खाटू श्याम मंदिरात गेल्या २० वर्षांपासून फाल्गुन महिन्यातील एकादशीच्या पावन पर्वावर हा रंगरंगीला फाल्गुन मेळा आयोजित केला जातो. फाल्गुन शुक्ल पक्ष नवमी ते फाल्गुन शुक्ल त्रयोदशीपर्यंत चालणाऱ्या या विशाल मेळ्यात दररोज श्री श्यामबाबांची मुर्ती रंगीबेरंगी फुलांनी सुशोभित केली जाते. संध्याकाळी ६ वाजता श्री श्यामबाबांची पवित्र ज्योत प्रज्वलित केली जाते आणि भव्य भजन संध्या आयोजित केली जाते.




या भजन संध्यांमध्ये संपूर्ण भारतभरातील प्रसिद्ध श्याम भजन गायक आपल्या भक्तिमय सुरांनी उपस्थित भक्तांना मंत्रमुग्ध करतात. मंदिर परिसरात येणाऱ्या सर्व भक्तांसाठी दररोज प्रसादरूपी भंडाऱ्याचे आयोजन केले जाते, ज्याचा लाभ हजारो भक्त घेतात. एकादशीच्या दिवशी दर्शनासाठी भक्तांची मोठी गर्दी उसळते. भक्तगण मोठ्या श्रद्धेने आणि शिस्तबद्ध रीतीने या मेळ्यात सहभागी होतात, ज्यामुळे हजारो भक्तांची उपस्थिती असूनही मेळ्यातील वातावरण भक्तिरसाने भारलेले असते.

भजन संध्या आणि विशेष कार्यक्रम ८ मार्चला अमरावतीच्या सुप्रसिद्ध भजन गायिका स्वर मीरा स्वर श्री जी यांचे 'श्री श्याम आराधना' भजन कार्यक्रम, ९ मार्चला नागपूरच्या मास्टर कार्तिक यादव आणि ग्रुप यांचा 'पुकार बालक की' भजन संध्या,११ मार्चला सकाळी ८.३० ते ११.३० द्वादशी (बारस) पवित्र ज्योत प्रज्वलन, श्री श्यामबाबांना प्रिय असलेल्या चुरमा (सव्वामणी) व खीरचा महाप्रसाद, ११ मार्चला संध्याकाळी ६ वाजता मुंबईच्या सुप्रसिद्ध भजन गायिका दिव्या (बिट्टू) तिवारी यांचा 'मिलेंगे श्याम कीर्तन में' कार्यक्रम, १२ मार्च ( मेळ्याचा समारोप संध्याकाळी ६ वाजता दुर्गच्या सुप्रसिद्ध गायिका ट्विंकलजी खेमुका (पारख) यांचा 'श्याम से मिलन होगा हमारा' भजन संध्या हा कार्यक्रम होणार आहे.

### १० मार्च रोजी भव्य निशान यात्रा

१० मार्च रोजी सकाळी ९ वाजता, हाताने चालवल्या जाणाऱ्या लाकडी रथावर विराजमान असलेल्या श्री श्यामबाबांच्या मूर्तीची भव्य निशान यात्रा जे.बी. जिन येथून सुरू होऊन शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करेल आणि श्री बालाजी-खाटू श्याम मंदिरात पोहोचेल. या यात्रेत महाकाल झांझ पथक, भजन दिंडी, तसेच पारंपरिक राजस्थानी वेशभूषेत महिला व पुरुष श्री श्यामबाबांच्या ध्वजा (निशान) हाती घेऊन सहभागी होतील. या यात्रेच्या स्वागतासाठी विविध ठिकाणी ज्योत पूजन व जलपान व्यवस्था केली जाईल.एकादशीच्या दिवशी मंदिर संपूर्ण दिवस दर्शनासाठी खुले राहील. यावेळी हिंगणघाट, वर्धा, आर्वी, पुलगाव, देवळी, अमरावती, यवतमाळ, चांदूर रेल्वे येथून मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येतात. तसेच तळेगाव दशासर, आर्वी व चांदूर रेल्वे येथून पदयात्रा स्वरूपात भक्तगण डीजेच्या तालावर नाचत निशान यात्रा काढतात. संध्याकाळी ६ वाजता 'कीर्तन की है रात' या भजन संध्येत छत्तीसगड, राजनांदगावच्या सुप्रसिद्ध गायिका राधिका शर्मा आपल्या मधुर आवाजाने भक्तांना भक्तीरसात चिंब करतील. त्यानंतर रात्री १० वाजता छप्पन भोग अर्पण व महाआरती होईल.

**मेळ्याची जोरदार तयारी**

या विशाल रंगरंगीला फाल्गुन मेळ्याच्या तयारीला वेग आला आहे. श्री बालाजी-खाटू श्याम सेवा समितीने सर्व भक्तगणांनी अधिकाधिक संख्येने या मेळ्यात सहभागी होऊन आनंद घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# सुपर स्पेशालिटीत हेलिपॅड; तिसऱ्या टप्प्याच्या हालचाली

## अवयवदानाची प्रक्रिया वेळेत व्हावी म्हणून महत्वपूर्ण प्रस्ताव

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती–** सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये तिसऱ्या टप्प्याला वेग आला असून, या इमारतीच्या छतावर हेलिपॅड तयार केले जाणार आहे. अवयवदानाची प्रक्रिया नेमक्या वेळेत व्हावी, यासाठी ही सुविधा करण्यात येत आहे. विशेष म्हणजे ती अमरावतीच्या आरोग्य क्षेत्रातील क्रांतिकारी घटना ठरणार आहे.

सुपर स्पेशालिटी रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे यांनी त्यासाठीचा प्रस्ताव तयार केला असून, तो आरोग्य महासंचालकांकडे पाठवला आहे. आमदार सुलभा खोडके यांनीही हा मुद्दा उचलून धरत आरोग्य मंत्र्यांकडे पाठपुरावा सुरू केला आहे. टप्पा ३ मध्ये पोटविकाराशी संबंधित गॅस्ट्रो एन्टेरोलॉजी आणि गुडघा, मांडी तसेच कान या अवयवांशी संबंधित इम्प्लांट सर्जरी सुरू केली जाणार आहे. सुपर स्पेशालिटीमध्ये सध्या दोन टप्प्यात तयार झालेल्या दोन इमारती आहेत.

टप्पा १ मध्ये तयार झालेल्या इमारतीत युरोलॉजी, प्लास्टिक सर्जरी, नेफ्रोलॉजी, डायलिसिस युनिट, पेडियाट्रिक सर्जरी, एआयसीयू, पॅथॉलॉजी, हिस्टोपॅथोलॉजी आणि किडनी प्रत्यारोपण सुरू करण्यात आले. तर दुसऱ्या टप्प्यातील इमारतीमध्ये न्युरोलॉजीच्या शस्त्रक्रिया, ऑन्कोलॉजीच्या शस्त्रक्रिया आणि इको विभाग थाटण्यात आला. त्यामुळेच आता तिसऱ्या टप्प्यात पोटविकार आणि कान-नाक-घसा तसेच गुडघा, मांडी आदीचे आजार बरे केले जातील. हा विभाग १०० खाटांचा असेल. अशाप्रकारे आधीचे २२० खाटांचे हे रुग्णालय ३२० खाटांचे होणार आहे. नव्या इमारतीसाठी १८ कोटी ४२ लाख रुपयांचे अंदाजपत्रक तयार करून ते संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठवले आहे.



इमारत बांधकामास जागेची उपलब्धता ही जमेची बाब टप्पा ३ मध्ये तयार कराव्या लागणाऱ्या इमारतीसाठी सुपर स्पेशालिटीत जागाही उपलब्ध आहे. जिल्हा स्त्री रुग्णालयाची नवी इमारत तयार झाली असल्याने जुनी इमारत निकामी होणार आहे. त्यामुळे मोकळी होणारी ती जागा तसेच प्री फॅब हॉस्पिटलच्या बाजूची खुली जागा टप्पा तीनमधील नव्या इमारतीसाठी वापरली जाणार आहे. याच इमारतीच्या छतावर पुढे हेलिपॅडची सोय व्हावी, अशी संबंधित प्रशासनाची योजना आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग त्यादृष्टीने तयारीला लागला आहे.

बॉक्स

### भविष्याचा वेध घेऊन नियोजन

सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या इमारतीमध्ये हेलिपॅड तयार करण्याचा मुद्दा हा भविष्याचा वेध घेऊन पुढे आला आहे. बरेचदा 'ब्रेन डेड' रुग्णांनी दान केलेले अवयव हे विशिष्ट वेळेच्या आतच दुसऱ्या रुग्णांवर प्रत्यारोपित करावे लागतात. त्यामुळे बरीच धावपळ होते. संबंधित रुग्णाला वेळेच्या आत येथे पोहोचावे लागते. हेलिपॅड झाल्यास दिल्ली, बंगळुरू, हैदराबाद येथील रुग्णांनाही लाभ देता येणे शक्य होणार आहे.

**डॉ. अमोल नरोटे,** वैद्यकीय अधीक्षक, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, अमरावती.–

# महावितरण तर्फे प्रस्तावित दरवाढ ग्राहकांवर बोजा टाकणारी, सौर ऊर्जा ग्राहकांना प्रोत्साहन देण्याऐवजी शासन धोरणांना हरताळ फासणारी कृती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती–** महावितरण वीज कंपनी द्वारे सर्वसामान्य नागरिकांवर बोजा टाकणारी नवीन वीज दरवाढ प्रस्तावित केली असून सौर ऊर्जा ग्राहकांना सुद्धा नवनवीन नियम लावून जेरीस आणण्याचा प्रयत्न चालवलेला आहे. या वीज दरवाढीच्या प्रस्तावाच्या विरोधात महाराष्ट्राचे माजी ऊर्जा राज्यमंत्री तसेच अमरावती जिल्ह्याचे माजी पालकमंत्री डॉ.सुनील देशमुख यांनी लेखी स्वरूपात हरकत घेऊन महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे दाखल केलेली होती. आज अमरावती येथे महाराष्ट्र वीज नियामक आयोगासमक्ष दाखल हरकती व सूचनांवर प्रत्यक्ष सुनावणी आयोजित करण्यात आली होती. येथे डॉ.सुनील देशमुख यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून प्रस्तावित वीजदर वाढीला तीव्र विरोध करून सौर ऊर्जा ग्राहकांवर लादण्यात येणाऱ्या नवीन अटींना सुद्धा विरोध केलेला आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून तब्बल आठ हजार वैयक्तिक वीज ग्राहकांनी, विविध वीज ग्राहक संघटनांनी व स्पिनिंगमिल संस्थांनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात नोंदवलेले आहेत. त्याची आता विभागीय स्तरावर ठिकठिकाणी प्रत्यक्ष सुनावणी होत आहे. नवीन वीज दरवाढ एक एप्रिल पासून प्रस्तावित असून महाराष्ट्रामध्ये रूफटॉप सौर ऊर्जेच्या माध्यमातून त्याचप्रमाणे सौर ऊर्जा प्रकल्पांमधून तब्बल २००० मेगावॅट विजेची निर्मिती होत असून ती अत्यंत कमी दरामध्ये म्हणजे केवळ ३ रुपये युनिटने महावितरणला मिळते. असे असताना खरेदी मध्ये मोठी बचत होत असताना सुद्धा ग्राहकांवर वीजदर वाढीचा बोजा लादण्याचे महावितरण चे सगळे प्रयत्न हाणून पाडणे गरजेचे असल्याचे डॉक्टर सुनील देशमुख यांनी यावेळी प्रकर्षाने नमूद केले.यावेळी त्यानी वीज नियामक आयोगाकडे महावितरणचा वीज दरवाढीचा प्रस्ताव रद्द करण्याची मागणी केली आहे. तसेच, दरवाढ रोखण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची विनंती केली आहे.या प्रस्तावाविरोधात मुख्यमंत्र्यांनी हस्तक्षेप करण्याची मागणी सुद्धा त्यानी यावेळी केली आहे. सौर ऊर्जा निर्मिती करणाऱ्या ग्राहकांच्या वतीने त्यांनी आपल्या मागण्या लेखी स्वरूपात सुद्धा सादर केलेल्या आहेत.१. सुधारित टूओडी वेळेनुसार:जुने टाइम स्लॉट कायम ठेवण्याची आणि टॅरिफ रचनेत बदल करू नये अशी मागणी करीत आहोत.)पूर्वीच्या टाइम स्लॉटप्रमाणे ऑफ पीक टाइम झोन राखावा म्हणजे रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत आणि रात्रीच्या वेळेत देखील वीज समायोजन करण्याची परवानगी सौर ऊर्जा ग्राहकांना मिळेल.



### महावितरणच्या वीज दरवाढ प्रस्तावात अनेक अन्यायकारक तरतुदी

महावितरणच्या प्रस्तावात अनेक अन्यायकारक तरतुदी असल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला विशेषतः घरगुती ग्राहकांसाठी सवलतीची घोषणा या मध्ये करण्यात आलेली होती परंतु ती अत्यंत फसवी आहे.१ ते १०० युनिट वीज वापरणार्या ग्राहकांना 'टाइम ऑफ डे' योजनेचा लाभ घेण्यासाठी स्मार्ट मीटर बसविणे अनिवार्य करण्यात आले आहे.यापूर्वी स्मार्ट मीटर योजनेला ग्राहकांनी जोरदार विरोध केला होता आणि ती बंद पाडली होती. आता त्याच योजनेला वेगळ्या पद्धतीने रेटण्याचा प्रयत्न महावितरण करत असून हा प्रकार निंदनीय आहे.लघू व उच्च दाब (एलटी/एचटी) उद्योगांसाठी डिमांड चार्जेस, व्हिलिंग चार्जेस, वीज आकार आणि टीओडी (टाइम ऑफ डे) चार्जेसमध्ये मोठी वाढ प्रस्तावित आहे, ती अन्यायकारक आहे. त्या वाढीवर इलेक्ट्रिसिटी ड्युटीही भरावी लागेल. या दरवाढीमुळे उद्योगांवर मोठा आर्थिक भार येणार आहे.

# तापी पुनर्भरण प्रकल्पाला विरोध वाढला

## हरदा गावात मुख्य कार्यकर्त्यांची बैठक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४मेळघाट**

१९ हजार कोटीच्या खर्चाने धारणी व मध्य प्रदेशच्या घुटीघाट दरम्यान दीड किमी लांब बांधल्या जाणार्या तापी पुनर्भरण प्रकल्पाला शासकीय मंजुरी प्राप्त होताच दोन्ही राज्यात प्रचंड विरोध सुरू झालेला आहे. तापी किनार्यावरील हरदा (ता. धारणी) येथे मुख्य कार्यकर्त्यांची एक सभा होऊन पुढील आंदोलनावर चर्चा करण्यात आली. धारणीपासून ३५ कि. मी. अंतरावरील हरदा गावातील भिलटबाबा मंदिरात तापी विरोधकांची दुसरी सभा २ मार्च रोजी आयोजित करण्यात आलेली होती.

या सभेत मोठे धरणविरोधी सामाजिक कार्यकर्ता विवेकानंद माथने, यशवंत मौड, छोटेलाल उईके (गुरूजी), रामप्रसाद कवडे, अनिल उईके, धनसिंग कुमरे, श्रीचंद जांबेकर, अनिता धिकार, बंसीलाल धांडे, सरपंच निर्मल सावलकर यांनी तापी धरणामुळे होणार्या नुकसानीची समीक्षा करताना विरोध नोंदविला. विवेकानंद माथने, यशवंत मौड आणि मध्य प्रदेशच्या भैसदही तालुक्यातील ज्येष्ठ कार्यकर्ता छोटेलाल गुरूजी यांनी शासनाद्वारे देण्यात आलेल्या आकडेवारीबद्दल शंका व्यक्त करताना नुकसानीची चर्चा करण्यात येत नाही, असे मत व्यक्त केले. हरदाचे भिलट मंदिर अगदी तापी नदीच्या किनार्यावर असून येथेच धरणाचा विरोध करण्याचा निर्णय करून पुढील सभा मध्य प्रदेशच्या बैतुल जिल्ह्यातील दामजीपुरा गावाजवळच्या झिरनाबरकी गावात आयोजित करण्यात आलेली आहे.

या चावडी स्वरुप बैठकीत एकूण चार निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आले. प्रकल्पाला प्रखर विरोध, गावकेंद्रीत जलनियोजन, कृषीमालाला माफक भाव आणि मध्य प्रदेश शासनाच्या १० हेक्टर जमीन कंपनीला देण्याच्या निर्णयाला विरोध करण्यात आला. एका माहितीनुसार, प्रस्तावित धरणामुळे एकूण ८११८ हेक्टर भूमी प्रभावित होईल. ४८३६ हेक्टर खासगी जमीन, ६७४ हेक्टर शासकीय जमीन तथा २६०८ हेक्टर जंगल प्रभावित होणार असल्याने विरोधक आक्रमक पवित्रा घेणार, असे संकेत आहे. ढरळि झीक्षशलीं-चझ-चरहरीरिहीर तापी किनार्यावरील कुंड, रंगुबेली, कुटंगा, हरदा, बैरागड, कसाईखेडा, चेथर, सोनाबर्डी, खार्या कोकदाबोड (महाराष्ट्र) आणि मध्य प्रदेशातील नामुनार, गोगलपूर, दावरा, बाटला, दिदम्बा, घुटी, भूरभूर, पाली, झाकस या गावांचे आदिवासी फार घाबरलेले आहेत.

# टोंगलाबाद फाट्याजवळ कारवर टोळक्याचा हल्ला

## सोयरिकसाठी आले होते खामगावहून, ४ जखमी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४दर्यापूर**

टोंगलाबाद फाट्याजवळ एका वाहनावर ४ ते ५ जणांच्या टोळक्याने हल्ला केला. या हल्ल्यात खामगावच्या देशमुख कुटुंबातील ४ सदस्य जखमी झाले. कारचा हॉर्न का वाजवला, या कारणातून त्यांनी प्रथम वाद घातला आणि त्यानंतर मारहाण केली, असे पोलिसांत दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, सोमवारी सायंकाळी ६ वाजता ही घटना घडली. देशमुख कुटुंबातील सदस्य सोयरीक संबंधाचा कार्यक्रम आटोपून वडनेर गंगाई येथून खामगावकडे एमएच १४ एल १८०७ या कारने ते जात होते. दरम्यान टोंगलाबाद फाट्याजवळ चार ते पाच तरुणांनी तू हॉर्न का वाजवला म्हणत वाद घातला. त्या तरुणांपैकी दोघे एका दुचाकीवर जात होते, तर इतर तेथेच उभे होते.

प्रारंभी या सर्वांनी कारमध्ये बसलेल्यांशी वाद घातला. त्यानंतर सर्वांनी मिळून तेथीलच लाकडी दांडा व दगड उचलून गाडीच्या समोरच्या काचावर फेकले. त्यामुळे गाडीचे बरेच नुकसान झाले. हल्लेखोर एवढ्यावरच थांबले नाहीत, तर त्यांनी कारमध्ये बसलेल्यांकडेही आपला मोर्चा वळवला. या मारहाणीत संकेत देशमुख, मिलिंद देशमुख, गुणवंतराव देशमुख आणि श्याम देशमुख जखमी झाले. हल्लेखोरांनी पळण्यापूर्वी पैशाची मागणी करून बळजबरीने मोबाइल हिसकावून घेतले. परंतु संकेत देशमुख यांनी झटापटीत मोबाइल परत घेतला आणि थेट दर्यापूर पोलिस स्टेशन गाठले. पोलिसांनी लगेच त्यांना येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असून, जखमींपैकी दोघांची प्रकृती गंभीर असल्याचे रुग्णालयीन सूत्रांचे म्हणणे आहे.हल्ला करणाऱ्या तरुणांचा उद्देश नेमका काय होता, हे कळू शकले नाही. ठाणेदार सुनील वानखडे यांच्या मार्गदर्शनात दर्यापूर पोलिस हल्लेखोर तरुणांचा शोध घेत आहेत.

# जि. प. शाळेत गॅसचा भडका:फायबर शेड व आहाराचे साहित्य खाक; जीवितहानी टळली



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४दर्यापूर**

शहरापासून ३ किमी. अंतरावर असलेल्या चांदूर-जहानपूर येथील जिल्हा परिषद शाळेत गॅसचा भडका उडाल्याने लागलेल्या आगीत अंदाजे २० ते २५ हजारांचे नुकसान झाले आहे. सुदैवाने जीवितहानी टळली आहे.

चांदूर-जहानपूर येथे इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतची जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा आहे. सोमवारी गॅस कनेक्शनला नवीन घेतलेल्या सिलिंडरची जोडणी करून विद्यार्थ्यांसाठी पोषण आहार शिजवण्यात आला. दरम्यान मदतनीस आवराआवर करत असतानाच गॅस गळतीमुळे भडका उडून आग लागली. तातडीने नगर परिषदेच्या अग्निशमन दलाला पाचारण करून आग विझविण्यात यश आले. या घटनेत पोषण आहार शिजवण्यासाठी शासनातर्फे देण्यात आलेले फायबर शेड (किचन रूम) जळून खाक झाले. तसेच पोषण आहाराचे काही साहित्य जळाले. घटनेच्या वेळी २० विद्यार्थी शाळेत उपस्थित होते.

# पश्चिमी विक्षोभामुळे दिवस व रात्रीच्या तापमानात घट होणार

## संत्रा, मोसंबीसाठी पोषक वातावरण, चार ते पाच दिवसांमध्ये तापमान १ ते ३ अंशांनी घटणार; तज्ज्ञांचा अंदाज



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

फेब्रुवारी महिन्यात दिवस व रात्रीच्या तापमानात कमालीचा फरक होता. दिवसा उन्हाचे चटके व रात्री गारवा, असे वातावरण अनुभवायला मिळाले. मात्र, मार्च महिन्याच्या प्रारंभीच पश्चिमी विक्षोभामुळे पुढील चार ते पाच दिवसांत दिवस व रात्रीच्या तापमानात १ ते ३ अंशांची घट येण्याची शक्यता असल्याची माहिती श्री शिवाजी कृषी महाविद्यालयाचे प्रा. अनिल बंड यांनी दिली.

पाकिस्तानवर पश्चिमी विक्षोभ सक्रिय आहे. त्यामुळे वायव्य भारत राजस्थान तसेच गुजरात, मध्य प्रदेशमध्ये तापमान घसरले आहे. परिणामी विदर्भात पुढील चार, पाच दिवस कमाल आणि किमान तापमानात १ ते ३ अंशाचीही घट येण्याची शक्यता आहे.

कमाल तापमान ३४ ते ३५, तर किमान तापमान १५ ते १८ सेल्सियस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे दिवसा उन्हाच्या चटक्यांपासून अमरावतीकरांना काही अंशी दिलासा मिळणार आहे, तर रात्रीचा गारवा व पहाटे आल्हाददायक वातावरण अनुभवता येईल. सोमवारी दिवसाचे तापमान ३७ अंश सेल्सियस, तर रात्रीचे तापमान १९.४ अंश होते. रविवारच्या तुलनेत तापमानात एक अंशाने घट आली.

### तापमानात घट होण्याची शक्यता

पाकिस्तानवर पश्चिमी विक्षोभ सक्रिय आहे. त्यामुळे वायव्य भारत राजस्थान तसेच गुजरात, मध्य प्रदेशात तापमान घसरले आहे. त्यामुळे पुढील चार ते पाच दिवस कमाल व किमान तापमान १ ते ३ अंशांनी घट येण्याची शक्यता आहे.

**प्रा. अनिल बंड, श्री शिवाजी कृषी महाविद्यालय.**

# विद्यापीठाच्या हिवाळी-२०२४ बी.एस.डब्ल्यू. सेमि.-४, बी.ए. सेमि.-१ व एम.टेक. (कॉस. टेक.) च्या फेरपरीक्षांची तारीख जाहीर

## विद्यार्थ्यांनी नोंद घेण्याचे विद्यापीठाचे आवाहन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या हिवाळी - २०२४ बी.एस.डब्ल्यू. सेमि. - ५ (सी.बी.सी.एस.) सोशल वेल्फेअर अ‍ॅन्ड डेव्हलपमेंट अ‍ॅडमिनीस्ट्रेशन, बी.ए. सेमि.-१ (एन.ई.पी.) मराठी लँग्वेज, एम.टेक. (कॉस टेक.) सेमि. -३ (एन.ई.पी.) अ‍ॅडव्हॉन्स कॉस्मेटीक टेक्नॉलॉजी - ३ या अभ्यासक्रमाच्या फेरपरीक्षांच्या तारखा विद्यापीठ प्राधिकारिणीने घेतलेल्या निर्णयानुसार विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडून जाहीर करण्यात आल्या अहेत.

बी.एस.डब्ल्यू. सेमि. - ५ (सी.बी.सी.एस.) सोशल वेल्फेअर अ‍ॅन्ड डेव्हलपमेंट अ‍ॅडमिनीस्ट्रेशन विषयाची फेरपरीक्षा श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला (२०५), बाबाजी दाते कला व वाणिज्य महाविद्यालय (४०२), यवतमाळ, लोकनायक बापुजी अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ (४१२) या परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार आहे.

बी.ए. सेमि.-१ (एन,ई.पी.) मराठी लँग्वेज विषयाची फेरपरीक्षा गुलाम नबी आझाद कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बार्शी टाकळी, जि. अकोला, (२१५), श्रीमती कोकीळाबाई गावंडे महिला महाविद्यालय, दर्यापूर १४०), जे.डी.पाटील सांगळुदकर महाविद्यालय, दर्यापूर (१०७), श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय, चिखली, जि. बुलडाणा (३०८), एस.पी.एम. सायन्स, गिलाणी आर्टस् व कॉमर्स महाविद्यालय, घाटंजी (४०८) या परीक्षा केंद्रांवर, तर एम.टेक. (कॉस टेक.) सेमि. -३ (एन.ई.पी.) अ‍ॅडव्हॉन्स कॉस्मेटीक टेक्नॉलॉजी - ३ या विषयाची फेरपरीक्षा विद्यार्थ्यांना यापूर्वीच देण्यात आलेल्या परीक्षा केंद्रावरुन घेण्यात येणार आहे.

सदर तिनही विषयांच्या फेरपरीक्षा सोमवार दि. १० मार्च, २०२५ रोजी दुपारी २.०० ते ५.०० या वेळेत घेण्यात येणार असून परीक्षेच्या वेळी विद्यार्थ्यांनी त्यांना देण्यात आलेले प्रवेश पत्र सोबत आणावेत, असे परीक्षा व मूल्यमापन विभागाकडून कळविण्यात आले आहे.

यासंदर्भात सर्वसंबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य, केंद्राधिकारी, महाविद्यालये, परीक्षा केंद्रांना कळविण्यात आले असून महाविद्यालयांनी याची तातडीने आपल्या विद्यार्थ्यांना जाणीव करुन द्यावी. तसेच विद्यार्थ्यांनी सुध्दा याची नोंद घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी केले आहे. अधिक माहितीकरीता त्यांचेशी ९८५००४२३५७ या क्रमांकावर संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

# थकीत मालमत्ता कराच्या दंडात ७५ टक्के सवलत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

महापालिकेतर्फे मालमत्ता कराचा एकरकमी भरणा करणाऱ्यांना थकीत कराच्या दंडात (शास्तीत) सवलत देण्यात येत आहे. १ ते १० मार्चपर्यंत थकबाकीसह मालमत्ता कराचा एकमुस्त ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने भरणा करणाऱ्या मालमत्ता धारकास ७५ टक्के शास्तीत सवलत देण्यात येत आहे. महापालिका क्षेत्रात संपूर्ण मालमत्तांच्या माध्यमातून दरवर्षी मागणी नोंदवण्यात आली असून, करदात्यांना कराची नोटीस पाठवून कर भरणा करण्यासाठी विनंती करण्यात आली आहे. कर न भरल्यास दंड वसुली तसेच प्रसंगी मालमत्ता सील करण्याची कारवाई करण्यात येत आहे. जास्तीत जास्त वसुली होऊन ती शहराच्या विकास कामांसाठी उपयोगी यावी या अनुषंगाने यंत्रणा जोमात कामाला लागली आहे.मालमत्ता कराच्या प्रभावी वसुली व संभाव्य उद्दिष्ट पूर्तीसाठी मनपातर्फे शास्तीत सवलत जाहीर करण्यात आली आहे. या शास्ती माफीचा लाभ घेण्याचे आवाहन महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी केले आहे.

# जि. प. च्या लोकदरबारात ९ तक्रारींची सुनावणी:चार प्रकरणे काढली निकाली

## १४ तक्रारींवर ६ मार्चपर्यंत कारवाई करण्याचे दिले आदेश



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

लोकशाही दिनाच्या धर्तीवर जिल्हा परिषदेने तक्रार निवारण दिन आयोजित केला आहे. दर महिन्याच्या पहिल्या आणि तिसऱ्या सोमवारी या दिनाचे आयोजन केले जाते. या क्रमात आज पार पडलेल्या तक्रार निवारण दिनात नऊ तक्रारींची सुनावणी करण्यात आली. तर दुसरीकडे जुन्या-नव्या एकूण १८ तक्रारींपैकी ४ तक्रारी निकाली निघाल्या असून १४ तक्रारींवर ६ मार्चपर्यंत कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत.

जिल्हा परिषदेच्या सीईओ संजीता महापात्र यांच्या संकल्पनेतून हा तक्रार निवारण दिन सुरू करण्यात आला आहे. तो त्यांच्यात दालनात भरवला जातो. परंतु ३ मार्चला मुंबईत त्यांना बालस्नेही पुरस्कार स्वीकारण्यासाठी जावे लागले. त्यामुळे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या (डीआरडीए) संचालक प्रीती देशमुख यांनी नागरिकांच्या तक्रारी ऐकून त्या संबंधित अधिकाऱ्यांकडे वर्ग केल्या.

गेल्या महिन्यापासून सुरू झालेला हा आजचा तिसरा लोकशाही दिन होता. त्यामुळे सर्वप्रथम गेल्या दोन तक्रार निवारण दिनात प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने तक्रारदारांना योग्य ती माहिती देण्यात आली. त्यानंतर आजच्या तक्रारींचा स्वीकार करून त्या संबंधित अधिकाऱ्यांकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठवण्यात आल्या. यावेळी जिल्हा परिषदेतील इतर विभागप्रमुख व काही पंचायत समित्यांचे बीडीओ उपस्थित होते.

कारवाई दरम्यान टवलार (ता. अचलपूर) येथील इम्रान खान रशीद खान पठाण, चांदूर बाजार तालुक्यातील शिरजगाव कसबा येथील संजय गुर्जर, अंजनगाव सुर्जी तालुक्यातील हिंगणी गावंडगाव येथील दिनेश अघडते आणि याच तालुक्यातील पांढरी खानमपूरचे पवन रायबोले व राम तुरखडे, मोर्शी तालुक्यातील पातूरचे शैलेश फरतोडे तसेच चांदूर बाजार तालुक्यातील नानोरीचे नीलेश राऊत यांनी आपापल्या तक्रारींची मांडणी केली.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी जिल्हा काँग्रेसचे इर्विन चौकात धरणे आंदोलन : खासदारांसह सर्व काँग्रेस पदाधिकारी उपस्थित



**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती**

शेतकऱ्यांना कर्जमाफी सारखे आश्वासने देऊनही शासनाकडून कोणत्याच प्रकारचा प्रतिसाद शेतकऱ्यांना दिला जात नाही, अशा शेतकऱ्याच्या अनेक प्रश्नांना घेऊन जिल्हा काँग्रेसच्या वतीने जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांच्या नेतृत्वात आज मंगळवार ४ मार्च रोजी चौक येथे सकाळी ११ वाजता पासून एक दिवसीय धरणे आंदोलन करून शासनाच्या धोरणाचा निषेध व्यक्त केला.

शेतकऱ्यांचे अत्यंत ज्वलंत प्रश्न आहेत. महाराष्ट्रातील महायुती शासनाने शेतकऱ्यांना कर्जमाफी सारखे अनेक आश्वासने दिलेली आहेत, मात्र त्यांच्या पुर्ततेसाठी राज्य शासनाकडून कोणतेही प्रयत्न सुरू नाहीत. तसेच शेतकऱ्यांचे इतर अनेक प्रश्न असून त्याकडे राज्यशासन सतत दुर्लक्ष करीत आहे. या कारणास्तव शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झालेला आहे. राज्य शासनाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होत आहे. या अधिवेशनामध्ये शासनाने शेतकऱ्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करावी अशी काँग्रेस पक्षाची मागणी आहे. जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने आज इर्विन चौक येथे एक दिवसीय धरणे आंदोलन करून निषेध व्यक्त करण्यात आला.यावेळी खासदार बळवंत वानखडे,मजी आमदार यशोमती ठाकुर ,विरेंद्र जगताप,बबलू देशमुख, सुधाकर भारसाकळे ,दिलीपकाळबांडे ,श्रीधर काळे,गिरीश चौधरी,रणजित तिडके,राजेंद्र शिर्के,रविन्द्र सारडा,प्रवीण काळे,श्रकांत झोडपे,जयंत देशमुख ,राजाभाऊ टवलारकर, दयाराम काळे,गिरीश कराळे सिद्धार्थ बोबडे ,विजय राऊत,सदानंद ढोले,विजय राठोड,सुरेश राव देशमुख पुनाजी मोरे यांच्या सह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# संजय गायकवाड, कुटे, प्रताप अडसड यांना हायकोर्टाची नोटीस

## चार आठवड्यांत उत्तर सादर करण्याचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४नागपूर**

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने सोमवारी निवडणुकीविरुद्धच्या प्रकरणामध्ये आमदार संजय गायकवाड, संजय कुटे व प्रताप अडसड यांना नोटीस बजावून चार आठवड्यांत उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले. प्रकरणावर न्यायमूर्ती अनिल किलोर यांच्यासमक्ष सुनावणी झाली.



पराभूत उमेदवार जयश्री शेळके (उद्धवसेना) यांनी गायकवाड (शिवसेना), स्वाती वाकेकर (काँग्रेस) यांनी कुटे (भाजप) तर, वीरेंद्र जगताप (काँग्रेस) यांनी अडसड (भाजपा) यांच्याविरुद्ध निवडणूक याचिका दाखल केली आहे. गायकवाड यांनी बुलडाणा, कुटे यांनी जळगाव जामोद तर, अडसड यांनी धामणगाव रेल्वे मतदारसंघामधून विजय मिळविला आहे. त्यांची निवडणूक रद्द करण्याची मागणी याचिकाकर्त्यांनी न्यायालयाला केली आहे.

निवडणूक आयोगाने ईव्हीएमद्वारे निवडणूक घेण्यापूर्वी विविध कायदेशीर प्रक्रियेची पूर्तता केली नाही. ईव्हीएमने निवडणूक घ्यायची असल्यास काही निकष देण्यात आले होते. त्याचे पालन झाले नाही. निकालानंतर पराभूत उमेदवारांनी मागणी केल्यानंतरही सीसीटीव्हीचे फुटेज, फॉर्म नंबर २७ दिले गेले नाही. पाच व्हीव्हीपॅटची फेरमोजणी करण्यास मान्यता आहे. अनेकांनी याकरिता पैसे भरले. मात्र, व्हीव्हीपॅटची मोजणीसुद्धा केली नाही, यासह विविध आरोप याचिकांमध्ये करण्यात आले आहेत. याचिकाकर्त्यांच्यावतीने ॲड. आकाश मून व ॲड. ऋग्वेद ढोरे यांनी बाजू मांडली.

# अमरावती जिल्हा परिषदेतील सेवानिवृत्त झालेले शिक्षक गट विमा रकमेच्या प्रतीक्षेत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती**

जिल्हा परिषदेतून शिक्षण विभागातून सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांना वर्ष ओलांडल्या नंतरही गट विम्याची रक्कम मिळाली नसल्याने सेवानिवृत्त शिक्षक कार्यालयात गट विम्याची रक्कम मिळावी म्हणून येरझरा मारत आहे.सेवानिवृत्त झालेले काही शिक्षक गट विमा रकमेच्या प्रतीक्षेत आहे.प्रशासनाने ही रक्कम अदा करून सेवानिवृत्त शिक्षकांना दिलासा देणे आवश्यक आहे. गट विमा योजना १९८२ ही १ मे १९८२ पासून लागू झाली आहे. ही योजना १ मे १९८२ रोजी सरकारी सेवेत असलेल्या किंवा त्यानंतर सेवेत दाखल झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांना लागू आहे आणि ती अनिवार्य आहे. राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना सेवेत मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना मदत करण्यासाठी विमा संरक्षण आणि निवृत्तीनंतर त्यांच्या संसाधनात वाढ करण्यासाठी एकरकमी रक्कम (कमी खर्चात आणि पूर्णपणे अंशदान आणि स्व-वित्तपुरवठा आधारावर) असे दुहेरी फायदे प्रदान करण्याचा हेतू आहे.बचत निधी अंतर्गत जमा झालेली रक्कम निवृत्तीनंतर निवृत्त होणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्याला सरकारने वेळोवेळी जाहीर केलेल्या दराने व्याजासह दिली जाते.परंतु येथील जिल्हा परिषदेतून शिक्षण विभागातून सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांना वर्ष ओलांडल्या नंतरही गट विम्याची रक्कम मिळाली नसल्याने सेवानिवृत्त शिक्षक कार्यालयात गट विम्याची रक्कम मिळावी म्हणून पाठपुरावा करत आहे.परंतु त्यांच्या पदरी निराशाच पडत आहे.

# अमरावती मध्यवर्ती कारागृहात १५० बंदीजनांचा रमजान महिन्यानिमित्त उपवास

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती**



मुस्लिम बांधवांसाठी रमजानचा पवित्र महिना रविवार, २ मार्चपासून सुरू झाला आहे. शनिवारी संध्याकाळी चंद्रदर्शन झाल्यानंतर, रमजान महिन्याची विशेष तरावीह नमाज अदा करण्यात आली आणि शनिवारी मध्यरात्री सेहरी केल्यानंतर, रविवारी रमजान महिन्याचा पहिला उपवास ठेवण्यात आला.

अमरावती मध्यवर्ती कारागृहातही १५० मुस्लिम बंदिजन कैदी रमजान महिन्यानिमित्त उपवास करत आहेत. उपवास करणाऱ्या कैद्यांमध्ये न्यायालयीन बंदीवान आणि शिक्षा झालेल्या कैद्यांचा समावेश आहे.कारागृह प्रशासनाने उपवास करणाऱ्या कैद्यांसाठी सेहरी आणि इफ्तारची विशेष व्यवस्था केली आहे. उपवास करणाऱ्या कैद्यांना वेगळ्या बॅरेकमध्ये ठेवण्यात आले आहे आणि त्यांना सेहरी आणि इफ्तारच्या साहित्यासह नमाज अदा करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. रमजान महिन्याच्या पहिल्या दिवसापासून तुरुंगातील कैदी उपवास पाळत आहेत. तो संपूर्ण महिनाभर उपवास ठेवेल. अमरावती कारागृह प्रशासनाने या कैद्यांना वेगवेगळ्या बॅरेकमध्ये ठेवून संपूर्ण व्यवस्था केली आहे. यामध्ये, शिक्षा झालेल्या कैद्यांना एका बॅरेकमध्ये ठेवले जाते, तर न्यायालयीन कैद्यांना दुसऱ्या बॅरेकमध्ये ठेवले जाते. कैद्यांना सेहरी, इफ्तार आणि नमाज पठण करण्याची व्यवस्था तुरुंगात करण्यात आली आहे. त्यांना सेहरी आणि इफ्तारच्या वेळी फळे, दूध, मिठाई, सुकामेवा, खजूर आणि नाश्ता दिला जात आहे. सेहरीसाठी पहाटे ३ वाजता दूध, पोहे आणि चहा असलेले जेवण दिले जाते. तर संध्याकाळी इफ्तारसाठी खजूर, केळी इत्यादी फळांसह जेवण दिले जाते. रमजाम दरम्यान कैद्यांसाठी सेहरी आणि इफ्तारच्या व्यवस्थेसोबतच, ईदच्या दिवशी शिरखुर्मा देखील आयोजित केला जातो.

# तळवेल गावाचा आवाज सोशल मीडियावर - शेतकऱ्याचा यूट्यूबवर जलवा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४तळवेल (चा.बाजार)**




आजच्या डिजिटल युगात फक्त शहरातील लोकच नाही, तर गावातील शेतकरीही सोशल मीडियाचा प्रभावी वापर करत आहेत. आपल्या गावातील विविध घटना, समस्या आणि विशेष गोष्टी यूट्यूबवर शेअर करून तळवेल येथील शेतकरी अनिल शेंद्रे आपल्या गावाचे नाव झळकवले आहे. तळवेल येथील शेतकरी आपल्या कॅमेऱ्यातून गावाची संस्कृती, शेतीचे प्रश्न, स्थानिक सण-उत्सव आणि गावातील लहान-मोठ्या घडामोडी प्रेक्षकांपर्यंत पोहोचवत आहे. त्याचे व्हिडिओ पाहून अनेक लोक गावातील समस्या समजू लागले आहेत, तर काही ठिकाणी प्रशासनानेही लक्ष घालायला सुरुवात केली आहे. यूट्यूबसारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा योग्य उपयोग करून तो गावकऱ्यांचा खरा आवाज बनला आहे. त्याच्या प्रयत्नांमुळे गावाची ओळख आता केवळ स्थानिक पातळीवर नाही, तर संपूर्ण महाराष्ट्रात होत आहे.

गावासाठी काहीतरी वेगळं करण्याची जिद्द असेल, तर इंटरनेटदेखील एक ताकदवान शस्त्र ठरू शकतं! असे तळवेल येथील शेतकरी अनिल शेंद्रे यांनी सिद्ध करून दाखवले कुठल्याही वयामध्ये सोसिअल मीडिया गजवू शकतो याला कुठल्याही वयाचे बंधन नसल्याचे त्यांनी चित्र उभे केले आहे यांनी आजपर्यंत शेतकऱ्यांनीची व्यथा आजूबाजूच्या प्रसिध्द ठिकाणे त्यांची माहिती गाणे चित्रफिती सारख्या सोसिअल मीडिया वर आपल्या चॅनल वर पोस्ट केल्या आहे.गावच्या मातीत वाढलेला हा शेतकरी आता सोशल मीडियाच्या दुनियेतही चमकत आहे! शेती, ग्रामीण संस्कृती, स्थानिक समस्या आणि गावातील अनोख्या कथा यूट्यूबवर शेअर करून त्याने आपल्या गावाचे नाव मोठे केले आहे. या शेतकऱ्याने आपल्या कॅमेऱ्यातून गावातील वास्तव दाखवायला सुरुवात केली. शेतातील मेहनत, पारंपरिक पद्धती, शेतकऱ्यांच्या समस्या आणि तिथल्या खास गोष्टी यामुळे लोक त्याच्या व्हिडिओंना भरभरून प्रतिसाद देत आहेत. आपले नाव मोठे करण्यासाठी कुठल्याही वयाचे बंधन नसून युवाकांनी सोसिअल मीडिया चा वापर फक्त मनोरंजन व टाईमपास करण्यासाठी करू नये आपले नाव आपल्या गावाचे नाव मोठे करण्यासाठी आपले करियर घडवाण्यासाठी सुद्धा करू शकतो असे त्यांनी सिद्ध करून नाव युवाकांसाठी आदर्श उभा केला आहे.

# धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यावर काय म्हणालेत बच्चू कडू/यशोमती ठाकूर



धनंजय मुंडे यांनी राजीनामा देऊन भागणार नाही, या प्रवृत्तीला खतपाणी कोणी घातलं? कशाप्रकारे ह्या प्रवृत्ती देशभरात राज्यभरात वाढत चालल्या आहे? पक्ष आणि कार्यकर्ता आणि कार्यकर्त्यांच्या माध्यमातून सत्ता एवढेच शिल्लक राहिलेला आहे.

हातात तलवारी घ्या आणि कापा,बलात्कार करा काही करा पण सत्ता आमच्या हाती द्या एवढा विचार करणाऱ्या राज्यकर्त्यांचा आम्ही निषेध केला पाहिजे.

मारणारा कोणत्या जातीचा होता व मरणारा कोणत्या जातीचा होता हा विषय महत्त्वाचा नाही,ज्या प्रवृत्तीने मारलं ज्या पद्धतीने त्यांना मारलं हे फार वाईट आहे.वाल्मीक कराड सारख्याला प्रवृत्तीला दहा,वीस वर्षात खतपाणी घातल्या गेलं, व महाक्रूरदादा या ठिकाणी निर्माण होतो व गुण निर्माण होते व त्याला राजाश्रय मिळते हे फार महत्त्वाचा आहे.धनंजय मुंडे यांनी स्वतःचा राजीनामा हा देशमुख यांना श्रद्धांजली देऊन केला नाही तर आजारपणाच कारण देऊन दिला असं सांगितलं ही काय प्रवृत्ती आहे? किती लहान पण लोकांना दाखवत आहे तुम्ही मंत्री आमदार आहात मोठेपण घेता आलं पाहिजे.सरकार एकीकडे प्रभू रामचंद्र च नाव घ्यायचा आणि दुसरीकडे अशा प्रवृत्तीला खतपाणी घालात आहे.



सत्ताधारी जे जुमले फेकत आहे त्याच आश्चर्य आहे, हेच सत्ताधारी लोक म्हणत होते की अजित पवार यांनी घोटाळा केला आहे, त्यांनी जेल मध्ये गेला पाहिजे, आज तेच ७० हजार कोटीचा भ्रष्टाचार उघडकिस करणारे लोक त्यांच्यासोबत सरकारमध्ये आहे. एकनाथ शिंदे यांच्या बाबत सुद्धा त्यांनी असं विधान केलं होतं

धनंजय मुंडे यांना शपथ देण्याचं कामच नव्हतं, कारण की हा सगळा गोंधळ शपथविधीच्या आधी उघडकीस आला होता.संतोष देशमुख यांची ज्या प्रकारे निर्गुण हत्या झाली त्यांचे फोटो व्हायरल झाले त्यानंतर विरोधी पक्षाने त्या ठिकाणी दबाव टाकला, व निर्लज्जपणाचा कळस घातल्यानंतर त्यांनी आज राजीनामा दिला.थोडी जरी नैतिक असती तर हे जे सत्तेमध्ये बसले आहे त्यांनी राजीनामा मागितला असता व जे मंत्री आहेत आणि राजीनामा दिला असता. प्रेशर केलं त्यामुळे राजीनामा दिला.नाही तर त्यांना सगळं गुंडाळायचा आहेहे सगळे अपराधी लोक त्या ठिकाणी बसले आहे व अपराध करणाऱ्या लोकांना त्यांनी शपथ दिली आहे. ही वास्तविकता आहे हे भ्रष्टाचारी सरकार आहे त्यांचा मूळ उद्देश सरकारमध्ये येऊन पैसे कमवायचा आहे.म्हणून सगळा गोंधळ सहन केला जात आहे

# दंडाची रक्कम भरा नाहीतर वाहन जप्त; वाहतूक पोलिसांची विशेष मोहीम

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती**

जिल्ह्यात एकीकडे रस्ते अपघातांमध्ये नागरिक मृत्यूमुखी पडत असताना वाहतूक नियमांचे उल्लंघनाचे प्रमाणही अधिक असल्याचे भीषण वास्तव समोर आले आहे. काही बेजबाबदार वाहन चालकांमुळे अपघात घडत आहे. वाहतुक पोलिसांकडून वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांविरोधात ई-चलान यंत्राद्वारे कारवाई केली जाते. गेल्या दोन महिन्यांत अमरावती जिल्हा ग्रामीण पोलिसांनी तब्बल १ कोटी ८ लाख ९५ हजार रुपयांचा पेड आणि अनपेड दंड वसूल केला आहे.

जिल्ह्यातील ग्रामीण भागात १ जानेवारी ते २८ फेब्रुवारी या दोन महिन्यांत विशेष मोहिमेदरम्यान अनपेड ७४ लाख ९९ हजार ३५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. याशिवाय पेड दंडाचे प्रमाण वाढविण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार ३३ लाख ३५ हजार १५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. असा एकूण १.०८ कोटी रुपयांचा दंड शासनजमा करण्यात आला आहे.वाहन चालविताना सिग्नल लाल रंगाचा असतानाही तो ओलांडणे, विना परवाना वाहन चालविणे, विरुद्ध दिशेने वाहने चालविणे, दुचाकी चालविताना शिरस्त्राण (हेल्मेट) वापरण्यास टाळाटाळ अशा प्रकारच्या



नियमांचे उल्लंघन केले जाते. वाहतुक पोलीस देखील नियमभंग करणाऱ्या चालकांच्या वाहन क्रमांकाचा केवळ छायाचित्र काढून ई-चलान करावाई करतात. त्यामुळे थकित दंड भरण्याकडे वाहन चालक दुर्लक्ष करत होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.पोलिसांच्या कारवाईमध्ये पारदर्शकता यावी. यासाठी राज्यभरात ई-चलान यंत्रणाद्वारे कारवाई केली जाते. नियमांचे उल्लंघन केल्यास त्या व्यक्तीला वाहनाच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर संदेशाद्वारे माहिती दिली जाते. त्यानंतर ती व्यक्ती ऑनलाईन किंवा वाहतुक पोलिसांच्या कार्यालयात जाऊन दंडाची रक्कम भरू शकते.

ग्रामीण पोलिसांनी ई-चलान दंड प्रलंबित असलेल्या वाहनचालकांच्या रहिवासी पत्त्यावर घरोघरी जाऊन नोटीस बजावली. यासाठी वाहतूक पोलीस अंमलदारांचे पथक नेमण्यात आले आहे. ही मोहीम येत्या ३१ मार्च पर्यंत सुरू राहणार असून या कालवधीत वाहनधारकांकडून प्रलंबित असलेल्या ई-चलान दंडाचा भरणा करण्यात येणार आहे. याशिवाय संकेतस्थळवर ऑनलाईनद्वारे किंवा कोणत्याही वाहतूक अंमलदाराकडे ई-चलान यंत्राद्वारे दंडाचा भरणा करण्यात येणार आहे. ज्या वाहनधारकांनी दंड भरला नाही, त्या वाहनांविरूद्ध कारवाई करण्यात येत आहे. नागरिकांनी जागरूकता बाळगून वाहनावरील प्रलंबित ई-चलान दंड भरून शासनजमा करावे, असे आवाहन ग्रामीण पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी केले आहे.